# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे

१३२/ब, भांबुर्डा, भोसले नगर, पुणे – ४११ ००७

## प्रवेश माहिती पुस्तिका २०२५-२६

## महाराष्ट्र राज्यातील कृषी विद्यापीठामधील
## आचार्य पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश

प्रवेश प्रक्रियेकरिता लिंक- : **https://phd.agrimcaer.in**

मदतीकरिता दूरध्वनी क्रमांक : ८८०६६१२९९८

मदतीकरिता ई-मेल पत्ता : **phd.mcaer@gmail.com**

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com दूरध्वनी : (०२०) २५५२८६८८.

संकेतस्थळ : www.mcaer.org

दि.११ डिसेंबर ,२०२५ रोजी प्रकाशित.

(प्रवेश प्रक्रियेविषयक कायदेशीर बाबी उद्भवल्यास इंग्रजी माहिती पुस्तिका ग्राह्य धरण्यात येईल.)

# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे व राज्यातील चारही कृषी विद्यापीठातील पदाधिकारी व शिक्षणाशी संबंधित अधिकारी

| पदाधिकारी | नाव | दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|
| कुलपती व राज्यपाल, महाराष्ट्र राज्य | महामहिम श्री. आचार्य देवव्रत | ०२२-२३६३२६६० |
| कृषी मंत्री, महाराष्ट्र राज्य,<br>प्रति-कुलपती व अध्यक्ष, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे | मा. ॲड. दत्तात्रय भरणे | ०२२-२२०२३२९४<br>०२२-२२०२२४०१ |
| उपाध्यक्ष | मा. श्री. तुषार पवार | ०२०- २५५२८४८१ |
| महासंचालक | श्रीमती वर्षा लड्डा-उंटवाल(भाप्रसे) | ०२०- २५५२८२५७ |
| संचालक (शिक्षण) | डॉ. यशवंत साळे | ०२०- २५५२८६८८ |
| संचालक (विस्तार शिक्षण व साधनसामुग्री विकास) | डॉ. श्रीमती मंगल कदम | ०२०- २५५२८५७७ |
| संचालक (संशोधन) | डॉ. किशोर शिंदे | ०२०- २५५२८६८८ |
| सहसंचालक (प्रशासन) | श्रीमती आरती भोसले | ०२०-२५५२८२०८ |
| सहसंचालक (वित्त) | श्रीमती रुपाली कोळी | ०२०-२५५२८२०८ |

**संकेतस्थळे:** www.mcaer.org & https://pg.agrimcaer.in, **email:** mcaer@rediffmail.com,edn_mcaer@rediffmail.com

**महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी ४१३ ७२२ जि. अहिल्यानगर**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | कुलगुरु | डॉ. वि. का. खर्चे | ०२४२६-२४३२०८ |
| २ | अधिष्ठाता (कृषी) | डॉ. सा. भां. खरबडे | ०२४२६-२४३२२७ |
| ३ | कुलसचिव | श्री. रा. भा. पाटील | ०२४२६-२४३२१६ |
| ४ | उपकुलसचिव (विद्या) | श्रीमती स्वा. दि. निकम | ०२४२६-२४३२१५ |

**संकेतस्थळ:** mpkv.mah.nic.in **email:** dracdmpkv2013@rediffmail.com

**डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला ४४४ १०४**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | कुलगुरु | डॉ. श. रा. गडाख | ०७२४-२२५८३६५ |
| २ | अधिष्ठाता (कृषी) | डॉ. दे. मो. पंचभाई | ०७२४-२२५८०९३ |
| ३ | कुलसचिव | डॉ. स. कृ. ठाकरे | ०७२४-२२५८३७२ |
| ४ | उपकुलसचिव (विद्या) | डॉ. स. कृ. ठाकरे | ०७२४-२२५८३४८ |

**संकेतस्थळ:** www.pdkv.ac.in **email :-** dyracad@pdkv.ac.in

**वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी ४३१ ४०२**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | कुलगुरु | डॉ. इन्द्र मणि | ०२४५२-२२३००२ |
| २ | अधिष्ठाता (कृषी) | डॉ. भ. वि. आसेवार | ०२४५२-२२२६८७ |
| ३ | कुलसचिव | श्री. सं. सि. वेणीकर | ०२४५२-२२९७५५ |
| ४ | उपकुलसचिव (विद्या) | डॉ. ग. अ. भालेराव | ०२४५२-२२७९०० |

**संकेतस्थळ:** mkv2.mah.nic.in **email:** dy.regacad@vnmkv.ac.in

**डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली ४१५ ७१२**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | कुलगुरु | डॉ. सं. घ. भावे | ०२३५८-२८२०६४ |
| २ | अधिष्ठाता (कृषी) | डॉ. स. सो. नारखेडे | ०२३५८-२८४३०८ |
| ३ | कुलसचिव | डॉ. सं. वि. सावर्डेकर | ०२३५८-२८२०६५ |
| ४ | उपकुलसचिव (विद्या) | श्री. सु. पं. दुसाने | ०२३५८-२८२४११<br>विस्तार १२५ |

**संकेतस्थळ:** www.dbskkv.org **email:** regrdbskkv@rediffmail.com

# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,
**१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे-४११ ००७.**

---

## प्रवेश माहिती पुस्तिका २०२५-२६
## महाराष्ट्र राज्यातील कृषी विद्यापीठामधील आचार्य पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश

**१. प्रस्तावना :**

**१.१** महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे (कृषी परिषद) ही महाराष्ट्र कृषी विद्यापीठे, अधिनियम, १९८३ चे कलम १२ अंतर्गत स्थापन झालेली वैधानिक संस्था आहे. राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत शिक्षण, संशोधन आणि कृषी विस्तार शिक्षण कार्यामध्ये प्रभावी समन्वय घडवून आणण्याचे कार्य कृषी परिषदेमार्फत करण्यात येते. कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण १५१७/प्र.क्र.६०/७अे, दि.३०/५/२०१८ विचारात घेऊन चारही कृषी विद्यापीठांतर्गत आचार्य पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेमध्ये कृषी परिषदेकडून समन्वयाचे काम करण्यात येत आहे.

**१.२** कृषी परिषदेच्या ९६ व्या बैठकीतील ठराव क्र. ०४/९६/२०१८ विचारात घेऊन राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतील आचार्य पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

**१.३** शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग, क्र. मकृवि २०१०/प्र.क्र. १५५ / ७अे, दि.२०/१०/२०११ अन्वये शासनाने, कृषी विद्यापीठांतर्गत पदवी, पदव्युत्तर व आचार्य पदवी अभ्यासक्रमामध्ये जागांचे आरक्षण, सामाजिक आरक्षणाच्या वाटपाची कार्यपध्दती निश्चित केली आहे. तसेच कृषी व पदुम विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण १५१४/प्र.क्र.१००/७ अे, दि.८/७/२०१९ आणि सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. बीसीसी २०२०/प्र.क्र.२९५/१६-ब, दि.२४/११/२०२० अन्वये आरक्षण आहे. याचबरोबर आचार्य पदवी अभ्यासक्रमाच्या विषयांचे वाटप १०० बिंदु नामावलीच्या आधारे करणे व त्याविषयीची कार्यपध्दती शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग, क्र. मकृप-१०२१/ प्र.क्र.१४५/७-अे, दि.१५/११/२०२१ अन्वये विहित करण्यात आलेली आहे. सदरचे शासन निर्णय कृषी परिषदेच्या संकेस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत.

१.४ मे. ॲनालिटीका बिझीनेस सोल्युशन्स, पुणे या संस्थेवर सामायिक प्रवेश प्रक्रिया **'ऑनलाईन पध्दती'**ने राबविण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

## १.५ कृषी विद्यापीठांचे कार्यक्षेत्र :

| अ. क्र. | कृषी विद्यापीठाचे नाव | कार्यक्षेत्रांतर्गत जिल्हे |
|---|---|---|
| १. | **म**हात्मा **फु**ले **कृ**षी **वि**द्यापीठ, राहुरी-४१३ ७२२, जि. अहिल्यानगर **(मफुकृवि - राहुरी)** | **अहिल्यानगर**, नाशिक, धुळे, नंदूरबार, जळगाव, पुणे, सोलापूर, सातारा, सांगली व कोल्हापूर |
| २ | **डॉ. पं**जाबराव **दे**शमुख **कृ**षी **वि**द्यापीठ, अकोला-४४४ १०४. **(डॉ.पंदेकृवि - अकोला)** | **अकोला,** अमरावती, यवतमाळ, वाशिम, बुलडाणा, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली व चंद्रपूर. |
| ३ | **व**संतराव **ना**ईक **म**राठवाडा **कृ**षी **वि**द्यापीठ, परभणी-४३१ ४०२. **(वनामकृवि - परभणी)** | **परभणी,** हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव , बीड, जालना व छत्रपती संभाजीनगर. |
| ४ | **डॉ. बा**ळासाहेब **सा**वंत **कों**कण **कृ**षी **वि**द्यापीठ, दापोली-४१५ ७१२. जि. रत्नागिरी **(डॉ. बासाकोकृवि - दापोली)** | **रत्नागिरी,** सिंधुदुर्ग, रायगड, ठाणे, पालघर, मुंबई शहर व मुंबई उपनगर. |

## १.६ व्याख्या :

### १.६.१ कृषी विद्यापीठ कोटा ['U' Quota]

ज्या उमेदवारांकडे महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र आहे. नसल्यास त्या उमेदवाराच्या महाविद्यालय सोडल्याच्या दाखल्यावर महाराष्ट्र राज्यातील जन्म ठिकाण आहे किंवा महाराष्ट्र राज्यात जन्म झाल्याचा सक्षम प्रधिका-याकडील जन्म दाखला आहे, आणि महाराष्ट्रातील संबंधित कृषी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातून पात्रता (पदवी) परीक्षा उत्तीर्ण आहे. अशा उमेदवारांसाठी राखून ठेवलेल्या जागांना **'कृषी विद्यापीठ कोटा' ['U' Quota]** असे संबोधण्यात यावे.

**१.६.२. महाराष्ट्र कोटा ['M' Quota]**

ज्या उमेदवारांकडे महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र आहे. नसल्यास त्या उमेदवाराच्या महाविद्यालय सोडल्याच्या दाखल्यावर महाराष्ट्र राज्यातील जन्म ठिकाण आहे किंवा महाराष्ट्र राज्यात जन्म झाल्याचा सक्षम प्रधिका-याकडील जन्म दाखला आहे. अशा उमेदवारांसाठी राखून ठेवलेल्या जागांना **'महाराष्ट्र कोटा' ['M' Quota]** असे संबोधण्यात यावे. यास्तव विद्यापीठ कोटयातील उमेदवार महाराष्ट्र कोटयाकरितासुध्दा पात्र आहेत.

**१.६.३ राज्याबाहेरील उमेदवारांसाठी कोटा ['O.S.' Quota]**

**प्रवेश घेण्यापूर्वी लगतच्या १० वर्षे मुदतीमध्ये किमान तीन वर्षे ज्या उमेदवारांनी व ज्यांच्या आई-वडिलांनी महाराष्ट्रात निवास केला नसेल, अशा व्यक्ती** आणि ज्या व्यक्तींनी महाराष्ट्राव्यतिरिक्त देशातील बाहेरील राज्यांचे अधिवास प्रमाणपत्र / रहिवाशी दाखला / मूळ रहिवास व जन्मदाखला धारण केलेले असेल, अशा उमेदवारांसाठी राखून ठेवलेल्या जागांना **'राज्याबाहेरील उमेदवारांसाठी कोटा' [Other State- O.S. Quota]** असे संबोधण्यात यावे.

**१.६.४ तिसरी प्रवेश वाटप फेरी**

नियोजित ऑनलाईन प्रवेश फे-या संपल्यानंतर रिक्त झालेल्या / असलेल्या जागांवर प्रवेश मिळण्यासाठी संबंधित महाविद्यालय / संस्थेच्या ठिकाणी उमेदवाराने प्रत्यक्ष उपस्थित राहणे आणि उपस्थित उमेदवारांमधून आरक्षण व गुणवत्तेनुसार ऑनलाईन पध्दतीने प्रवेश देण्याच्या प्रक्रियेस **तिसरी प्रवेश वाटप फेरी** असे संबोधण्यात यावे. **या प्रवेशासाठीच्या प्रक्रियेच्यावेळी अनुपस्थित असलेला उमेदवार 'तिसऱ्या प्रवेश वाटप फेरी'साठी पात्र ठरणार नाही.**

**१.६.५** "प्रवेश अर्ज" याचा अर्थ, उमेदवाराने प्रवेशाकरिता ऑनलाईन पध्दतीने भरावयाचा विहित नमुना, असा आहे;

**१.६.६** "ऑनलाईन प्रवेश वाटप फेरी" याचा अर्थ, उमेदवाराची गुणवत्ता, प्रवर्ग, पसंतीक्रम (विकल्प) विचारात घेऊन संगणकप्रणालीद्वारे प्रवेशाचे वाटप करण्याची कॅपअंतर्गत प्रक्रिया, असा आहे.

## २.	संस्था व आचार्य पदवी अभ्यासक्रमांचा तपशील :

परिच्छेद २.१ येथे नमूद करण्यात आलेल्या आचार्य पदवी अभ्यासक्रमांच्या महाराष्ट्र [**'M' Quota**] व विद्यापीठ [**'U' Quota**] कोटयाकरिता इच्छुक उमेदवारांनी **एकच प्रवेश अर्ज सादर करावा. आचार्य पदवी अभ्यासक्रमाचे शिक्षण व परीक्षेचे माध्यम इंग्रजी राहील.**

## २.१	विद्याशाखा, कालावधी, गुणांक भार [Credit load] आणि पात्रता :

आचार्य पदवी प्रवेश हे पूर्णतः गुणवत्ता आधारित असेल. महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळ यांच्याद्वारे चालू शैक्षणिक वर्षात घेण्यात आलेल्या संबंधित विषयातील आचार्य पदवी सामायिक प्रवेश परीक्षेचे गुण व अर्हता पदव्युत्तर पदवीचे गुण यांचे प्रमाण अनुक्रमे ७०:३० असे राहील. **अशाप्रकारे खुल्या प्रवर्गाच्या उमेदवारांसाठी एकत्रित किमान ६५ टक्के (१० बिंदु मापननुसार किमान ६.५) गुण आणि अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जमाती, विमुक्त जाती, इतर मागासवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, सामाजिक आणि शैक्षणिकदृष्टया मागासवर्ग, आर्थिक दुर्बल घटक, दिव्यांग (अपंग) आणि अनाथ उमेदवारांकरिता ६० टक्के (१० बिंदु मापननुसार किमान ६.० गुण) अनिवार्य आहेत.**

| अ.क्र. | विषय | पात्रता |
|---|---|---|
| | **(क) कृषी (कालावधी ३ वर्षे- सहा सत्रे) (किमान १०० श्रेयांक)** | |
| १. | कृषीविद्या | एम.एससी. (कृषीविद्या) व महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाद्वारे सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील 'कृषीविद्या' विषयाची सामायिक प्रवेश परीक्षा. |
| २. | कृषी हवामानशास्त्र | एम.एससी. (कृषी हवामानशास्त्र) व महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाद्वारे सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील 'कृषी हवामानशास्त्र' विषयाची सामायिक प्रवेश परीक्षा. |
| ३. | मृदशास्त्र | एम.एससी. (मृद्शास्त्र व कृषी रसायनशास्त्र / मृद्शास्त्र / कृषी रसायनशास्त्र / भू साधन व्यवस्थापन) व महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाद्वारे सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील 'मृद्शास्त्र' या विषयाची सामायिक प्रवेश परीक्षा. |

| अ.क्र. | विषय | पात्रता |
|---|---|---|
| ४. | जैवरसायनशास्त्र | एम.एससी. (जैवरसायनशास्त्र / कृषी जैवरसायनशास्त्र) व महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाद्वारे सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील 'जैवरसायनशास्त्र' विषयाची सामायिक प्रवेश परीक्षा. |
| ५. | वनस्पती शरीरशास्त्र | एम.एससी. (वनस्पती शरीरशास्त्र) व महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाद्वारे सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील 'वनस्पती शरीरशास्त्र' विषयाची सामायिक प्रवेश परीक्षा. |
| ६. | अनुवंश व रोप पैदासशास्त्र | एम.एससी. (अनुवंश व रोप पैदासशास्त्र) व महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाद्वारे सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील 'अनुवंश व रोप पैदासशास्त्र' विषयाची सामायिक प्रवेश परीक्षा. |
| ७. | बीजशास्त्र आणि तंत्रज्ञान | एम.एससी. (बीज तंत्रज्ञान / बीजशास्त्र आणि तंत्रज्ञान) व महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाद्वारे सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील 'बीजशास्त्र आणि तंत्रज्ञान' विषयाची सामायिक प्रवेश परीक्षा. |
| ८. | कृषी विस्तार शिक्षण | एम.एससी. (कृषी विस्तार व संज्ञापन / कृषी विस्तार शिक्षण) व महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाद्वारे सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील 'कृषी विस्तार शिक्षण' विषयाची सामायिक प्रवेश परीक्षा. |
| ९. | कृषी अर्थशास्त्र | एम.एससी. (कृषी अर्थशास्त्र) व महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाद्वारे सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील 'कृषी अर्थशास्त्र' विषयाची सामायिक प्रवेश परीक्षा. |
| १०. | कीटकशास्त्र | एम.एससी. (कृषी कीटकशास्त्र / कीटकशास्त्र) व महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाद्वारे सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील 'कीटकशास्त्र' विषयाची सामायिक प्रवेश परीक्षा. |
| ११. | वनस्पती रोगशास्त्र | एम.एससी. (वनस्पती रोगशास्त्र) व महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाद्वारे सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील 'वनस्पती रोगशास्त्र' विषयाची सामायिक प्रवेश परीक्षा. |
| १२. | सूक्ष्मजीवशास्त्र | एम.एससी. (सूक्ष्मजीवशास्त्र) व महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाद्वारे सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील 'सूक्ष्मजीवशास्त्र' विषयाची सामायिक प्रवेश परीक्षा. |

| अ.क्र. | विषय | पात्रता |
|---|---|---|
| १३. | पशुधन उत्पादन व व्यवस्थापन | एम.एससी. (पशुसंवर्धन / पशुविज्ञान / पशुधन उत्पादन व व्यवस्थापन) व महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाद्वारे सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील 'पशुधन उत्पादन व व्यवस्थापन' विषयाची सामायिक प्रवेश परीक्षा. |
| १४. | दुग्धशास्त्र | एम.एससी. (दुग्धशास्त्र) व महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाद्वारे सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील 'दुग्धशास्त्र' विषयाची सामायिक प्रवेश परीक्षा. |
| १५. | सिंचन जलव्यवस्थापन | एम.एससी. (सिंचन जलव्यवस्थापन) व महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाद्वारे सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील 'सिंचन जलव्यवस्थापन' विषयाची सामायिक प्रवेश परीक्षा. |
| **(ख) उद्यानविद्या (कालावधी ३ वर्षे- सहा सत्रे) (किमान १०० श्रेयांक)** | | |
| १६. | फळशास्त्र | एम.एससी. (उद्यानविद्या / फळशास्त्र) व महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाद्वारे सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील 'फळशास्त्र' विषयाची सामायिक प्रवेश परीक्षा. |
| १७. | भाजीपाला शास्त्र | एम.एससी. (उद्यानविद्या / भाजीपाला शास्त्र) व महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाद्वारे सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील 'भाजीपाला शास्त्र' विषयाची सामायिक प्रवेश परीक्षा. |
| १८. | फुलशेती व प्रांगण सुशोभिकरण आरेखन | एम.एससी. (उद्यानविद्या / फुलशेती व प्रांगण सुशोभिकरण आरेखन) व महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाद्वारे सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील 'फुलशेती व प्रांगण सुशोभिकरण आरेखन' विषयाची सामायिक प्रवेश परीक्षा. |
| १९. | मसाले, औषधी आणि सुगंधी पिकांचे रोपण | एम.एससी. (उद्यानविद्या / मसाले, औषधी आणि सुगंधी पिकांचे रोपण) व महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाद्वारे सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील 'मसाले, औषधी आणि सुगंधी पिकांचे रोपण' विषयाची सामायिक प्रवेश परीक्षा. |

| अ.क्र. | विषय | पात्रता |
|---|---|---|
| | **(ग) वनशास्त्र (कालावधी ३ वर्षे- सहा सत्रे) (किमान १०० श्रेयांक)** | |
| **२०.** | वनीय कुरण व वनशेती | एम.एससी. (वनीय कुरण व वनशेती / रोपन तंत्रज्ञान / वनशेती व पर्यावरणशास्त्र) व महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाद्वारे सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील 'वनीय कुरण व वनशेती' विषयाची सामायिक प्रवेश परीक्षा. |
| **२१.** | वन साधन व्यवस्थापन | एम.एससी. (नैसर्गिक साधन व्यवस्थापन) व महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाद्वारे सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील 'नैसर्गिक साधन व्यवस्थापन' विषयाची सामायिक प्रवेश परीक्षा. |
| | **(घ) मत्स्यविज्ञान (कालावधी ३ वर्षे- सहा सत्रे) (किमान १०० श्रेयांक)** | |
| **२२.** | मत्स्यशेती | एम.एफ.एससी. (मत्स्यशेती) व महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाद्वारे सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील 'मत्स्यशेती' विषयाची सामायिक प्रवेश परीक्षा. |
| **२३.** | मत्स्य प्रक्रिया तंत्रज्ञान | एम.एफ.एससी. (मत्स्य प्रक्रिया व तंत्रज्ञान / मत्स्य प्रक्रिया तंत्रज्ञान) व महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाद्वारे सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील 'मत्स्य प्रक्रिया तंत्रज्ञान' विषयाची सामायिक प्रवेश परीक्षा. |
| **२४.** | जलीय पर्यावरण व्यवस्थापन | एम.एफ.एससी. (जलीय पर्यावरण व्यवस्थापन) व महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाद्वारे सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील 'जलीय पर्यावरण व्यवस्थापन' विषयाची सामायिक प्रवेश परीक्षा. |
| **२५.** | मत्स्य संपत्ती व्यवस्थापन | एम.एफ.एससी. (मत्स्य संपत्ती व्यवस्थापन) व महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाद्वारे सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील 'मत्स्य संपत्ती व्यवस्थापन' विषयाची सामायिक प्रवेश परीक्षा. |
| **२६.** | मत्स्य पोषण व खाद्य तंत्रज्ञान | एम.एफ.एससी. (मत्स्य पोषण व खाद्य तंत्रज्ञान) व महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाद्वारे सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील 'मत्स्य पोषण व खाद्य तंत्रज्ञान' विषयाची सामायिक प्रवेश परीक्षा. |
| **२७.** | मत्स्य विस्तार | एम.एफ.एससी. (मत्स्य विस्तार) व महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाद्वारे सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील 'मत्स्य विस्तार शिक्षण' विषयाची सामायिक प्रवेश परीक्षा. |

| अ.क्र. | विषय | पात्रता |
|---|---|---|
| **(च) अन्न तंत्रज्ञान (कालावधी ३ वर्षे- सहा सत्रे) (किमान १०० श्रेयांक)** | | |
| **२८.** | अन्न प्रक्रिया तंत्रज्ञान | एम.टेक. (अन्न विज्ञान व तंत्रज्ञान / अन्न प्रक्रिया तंत्रज्ञान) व महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाद्वारे सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील 'अन्न प्रक्रिया तंत्रज्ञान' विषयाची सामायिक प्रवेश परीक्षा. |
| **(छ)** आण्विक जीवशास्त्र व जैवतंत्रज्ञान **(कालावधी ३ वर्षे- सहा सत्रे) (किमान १०० श्रेयांक)** | | |
| **२९.** | आण्विक जीवशास्त्र व जैवतंत्रज्ञान | एम.एससी. (कृषी जैवतंत्रज्ञान / जैवतंत्रज्ञान / आण्विक जीवशास्त्र व जैवतंत्रज्ञान) व महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाद्वारे सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील 'आण्विक जीवशास्त्र व जैवतंत्रज्ञान' विषयाची सामायिक प्रवेश परीक्षा. |
| **(ज) कृषी अभियांत्रिकी (कालावधी ३ वर्षे- सहा सत्रे) (किमान १०० श्रेयांक)** | | |
| **३०.** | सिंचन व निचरा अभियांत्रिकी | एम.टेक. (सिंचन व निचरा अभियांत्रिकी) व महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाद्वारे सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील 'सिंचन व निचरा अभियांत्रिकी' विषयाची सामायिक प्रवेश परीक्षा. |
| **३१.** | मृद् व जलसंधारण अभियांत्रिकी | एम.टेक. (मृद् व जलसंधारण अभियांत्रिकी) व महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाद्वारे सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील 'मृद् व जलसंधारण अभियांत्रिकी' विषयाची सामायिक प्रवेश परीक्षा. |
| **३२.** | प्रक्रिया व अन्न अभियांत्रिकी | एम.टेक. (प्रक्रिया व अन्न अभियांत्रिकी) व महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाद्वारे सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील 'प्रक्रिया व अन्न अभियांत्रिकी' विषयाची सामायिक प्रवेश परीक्षा. |
| **३३.** | कृषी यंत्रे व शक्ती अभियांत्रिकी | एम.टेक. (कृषी शक्ती आणि यंत्रे / कृषी यंत्रे व शक्ती अभियांत्रिकी) व महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाद्वारे सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील 'कृषी यंत्रे व शक्ती अभियांत्रिकी' विषयाची सामायिक प्रवेश परीक्षा. |
| **३४.** | अपारंपारिक ऊर्जा अभियांत्रिकी | एम.टेक. (अपारंपारिक ऊर्जा स्त्रोत / विद्युत व इतर ऊर्जा स्त्रोत / अपारंपारिक ऊर्जा अभियांत्रिकी) व महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाद्वारे सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील 'अपारंपारिक ऊर्जा अभियांत्रिकी' विषयाची सामायिक प्रवेश परीक्षा. |

| अ.क्र. | विषय | पात्रता |
|---|---|---|
| ३५. | कृषी संरचना व पर्यावरण व्यवस्थापन | एम.टेक. (कृषी संरचना व पर्यावरण व्यवस्थापन) व महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाद्वारे सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील 'कृषी संरचना व पर्यावरण व्यवस्थापन' विषयाची सामायिक प्रवेश परीक्षा. |
| **(झ)** | **काढणी पश्चात व्यवस्थापन (कालावधी ३ वर्षे- सहा सत्रे) (किमान १०० श्रेयांक)** | |
| ३६. | फळे, भाजीपाला व फुलपिके | एम.एससी. (काढणी पश्चात तंत्रज्ञान/ काढणी पश्चात व्यवस्थापन)- 'फळे, भाजीपाला व फुलपिके' व महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाद्वारे सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील 'फळे, भाजीपाला व फुलपिके' विषयाची सामायिक प्रवेश परीक्षा. |
| ३७. | औषधी, सुगंधी, मसाले व वन पिके | एम.एससी. (काढणी पश्चात तंत्रज्ञान/ काढणी पश्चात व्यवस्थापन)- 'औषधी, सुगंधी, मसाले व वन पिके' व महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाद्वारे सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील 'औषधी, सुगंधी, मसाले व वन पिके' विषयाची सामायिक प्रवेश परीक्षा. |
| ३८. | मांस, कुक्कुट व मत्स्य | एम.एससी. (काढणी पश्चात तंत्रज्ञान/ काढणी पश्चात व्यवस्थापन)- 'मांस, कुक्कुट व मत्स्य' व महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाद्वारे सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील 'मांस, कुक्कुट व मत्स्य' विषयाची सामायिक प्रवेश परीक्षा. |
| ३९. | काढणी पश्चात अभियांत्रिकी | एम.एससी. (काढणी पश्चात तंत्रज्ञान/ काढणी पश्चात व्यवस्थापन)- 'काढणी पश्चात अभियांत्रिकी' व महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाद्वारे सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील 'काढणी पश्चात अभियांत्रिकी' विषयाची सामायिक प्रवेश परीक्षा. |
| ४०. | अन्नधान्य व बीज | एम.एससी. (काढणी पश्चात तंत्रज्ञान/ काढणी पश्चात व्यवस्थापन)- 'अन्नधान्य व बीज' व महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाद्वारे सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील 'अन्नधान्य व बीज' विषयाची सामायिक प्रवेश परीक्षा. |

टिपः- १. संबंधित कृषी विद्यापीठाने विहित केलेले संबंधित विषयाच्या आराखडयातील कमतरता अभ्यासक्रम (Deficiency Courses) विद्यार्थ्याने पूर्ण करणे बंधनकारक राहील.

२. बाहेरील राज्यातील उमेदवारांची पदव्युत्तर पदवी भारतीय कृषी अनुसंधान परिषदेचे ॲक्रीडीटेशन असलेल्या कृषी विद्यापीठाची असणे अनिवार्य आहे.

३. वरील पात्रतेंतर्गत नमूद करण्यात आलेल्या सर्व पदव्युत्तर पदव्या कृषी विद्यापीठातून प्राप्त केलेल्या असणे अनिवार्य आहे.

## २.२ इतर निकष-

(१) उमेदवाराने पदव्युत्तर परीक्षेमध्ये १०.०० बिंदू मापन पध्दतीत किमान ६.५ सीजीपीए मिळविला असावा.

(२) ४ बिंदू मापन पध्दतीनुसार मिळालेला सीजीपीए १० बिंदू मापनमध्ये रुपांतरीत करण्यासाठी खालीलप्रमाणे सूत्र वापरण्यात येईल.

वाय = १.५ + २ एक्स, जेथे एक्स = २ ते ३.५ आणि

वाय = ८.५ + ३ {एक्स (-) ३.५}, जेथे एक्स = ३.५१ ते ४.००

जेथे, वाय = १० बिंदू मापन आणि

एक्स = ४.०० बिंदू मापन

## २.३ आचार्य पदवी प्रवेश क्षमता

### *२.३.१ (क) कृषी :*

| अ. क्र. | विषय | प्रवेश क्षमता | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | मफुकृवि, राहुरी | डॉ. पंदेकृवि, अकोला | वनामकृवि, परभणी | डॉ.बासाकोकृवि दापोली | |
| १. | कृषीविद्या | ६ | ५ | ६ | २ | १९ |
| २. | कृषी हवामानशास्त्र | २* | -- | २ | -- | ४ |
| ३. | मृद्‌शास्त्र | ४ | ५ | ६ | २ | १७ |
| ४. | जैवरसायनशास्त्र | २ | -- | -- | -- | २ |
| ५. | वनस्पती शरीरशास्त्र | -- | २ | २ | २ | ६ |
| ६. | अनुवंश व रोप पैदासशास्त्र | ६ | ३ | ६ | २ | १७ |
| ७. | बीजशास्त्र आणि तंत्रज्ञान | २ | -- | २ | -- | ४ |
| ८. | कृषी विस्तार शिक्षण | ४ | ३ | ६ | २ | १५ |
| ९. | कृषी अर्थशास्त्र | ४ | ३ | ६ | -- | १३ |
| १०. | कीटकशास्त्र | ६ | ३ | ६ | २ | १७ |
| ११. | वनस्पती रोगशास्त्र | ६ | ५ | ६ | २ | १९ |
| १२. | सूक्ष्मजीवशास्त्र | ४ | -- | -- | -- | ४ |
| १३. | पशुधन उत्पादन व व्यवस्थापन | ४ | १ | २ | १ | ८ |
| १४. | दुग्धशास्त्र | ४ | १ | २ | १ | ८ |
| १५. | सिंचन जलव्यवस्थापन | २ | -- | -- | -- | २ |
| | **एकूण** | **५६** | **३१** | **५२** | **१६** | **१५५** |

* सदरचा अभ्यासक्रम कृषी महाविद्यालय, पुणे येथे शिकविला जातो.

### *(ख) उद्यानविद्या*

| अ. क्र. | विषय | प्रवेश क्षमता | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | मफुकृवि, राहुरी | डॉ. पंदेकृवि, अकोला | वनामकृवि, परभणी | डॉ.बासाकोकृवि दापोली | |
| १. | फळशास्त्र | ४ | ४ | ३ | २ | १३ |
| २. | भाजीपाला शास्त्र | ४ | ४ | ३ | २ | १३ |
| ३. | फुलशेती व प्रांगण सुशोभिकरण आरेखन | -- | ४ | १ | २ | ७ |
| ४. | मसाले, औषधी आणि सुगंधी पिकांचे रोपण | -- | -- | -- | २ | २ |
| | **एकूण** | **८** | **१२** | **७** | **८** | **३५** |

### *(ग) वनशास्त्र*

| अ.क्र. | विषय | प्रवेश क्षमता |
|---|---|---|
| | | डॉ. बासाकोकृवि, दापोली |
| १. | वनीय कुरण व वनशेती | १ |
| २. | वन साधन व्यवस्थापन | १ |
| | **एकूण** | **२** |

### *(घ ) मत्स्यविज्ञान*

| अ.क्र. | विषय | प्रवेश क्षमता |
|---|---|---|
| | | डॉ. बासाकोकृवि, दापोली |
| १. | मत्स्यशेती | २ |
| २. | मत्स्य प्रक्रिया तंत्रज्ञान | २ |
| ३. | जलीय पर्यावरण व्यवस्थापन | २ |
| ४. | मत्स्य संपत्ती व्यवस्थापन | २ |
| ५. | मत्स्य पोषण व खाद्य तंत्रज्ञान | १ |
| ६. | मत्स्य विस्तार | २ |
| | **एकूण** | **११** |

### *(च) अन्नतंत्रज्ञान*

| अ.क्र. | विषय | प्रवेश क्षमता |
|---|---|---|
| | | वनामकृवि, परभणी |
| १. | अन्न प्रक्रिया तंत्रज्ञान | १० |

### *(छ) आण्विक जीवशास्त्र व जैवतंत्रज्ञान*

| अ.क्र. | विषय | प्रवेश क्षमता |
|---|---|---|
| | | डॉ. पंदेकृवि, अकोला |
| १. | आण्विक जीवशास्त्र व जैवतंत्रज्ञान | ३ |

### *(ज) कृषी अभियांत्रिकी*

| अ.क्र. | विषय | प्रवेश क्षमता | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | मफुकृवि, राहुरी* | डॉ. पंदेकृवि, अकोला | वनामकृवि, परभणी | डॉ. बासाकोकृवि, दापोली | एकूण |
| १. | सिंचन व निचरा अभियांत्रिकी | ३ | २ | २ | २ | ९ |
| २. | मृद् व जलसंधारण अभियांत्रिकी | ३ | २ | २ | २ | ९ |
| ३. | प्रक्रिया व अन्न अभियांत्रिकी | ३ | २ | १ | २ | ८ |
| ४. | कृषी यंत्रे व शक्ती अभियांत्रिकी | ३ | २ | २ | २ | ९ |
| ५. | अपारंपारिक ऊर्जा अभियांत्रिकी स्त्रोत | -- | २ | -- | २ | ४ |
| ६. | कृषी संरचना व पर्यावरण व्यवस्थापन | -- | -- | -- | २ | २ |
| | **एकूण** | **१२** | **१०** | **७** | **१२** | **४१** |

* प्रत्येक विषयातील एक जागा ही महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कार्यरत असणा-या उमेदवारांतून भरण्यात येईल.

### *(झ) काढणी पश्चात व्यवस्थापन*

| अ. क्र. | विषय | प्रवेश क्षमता |
|---|---|---|
| | | डॉ.बासाकोकृवि, दापोली |
| | | रोहा |
| १. | फळे, भाजीपाला व फुलपिके | १ |
| २. | मांस, कुक्कुट व मत्स्य | १ |
| ३. | काढणी पश्चात अभियांत्रिकी | १ |
| ४. | औषधी, सुगंधी, मसाले व वन पिके | १ |
| ५. | अन्नधान्य व बीज | १ |
| | **एकूण** | **५** |

टीपः-

१. वरील विषयांपैकी ज्या विषयांच्या पदव्या भारतीय कृषी अनुसंधान परिषदेकडे (भाकृअप) आहेत, अशा विषयांच्या ३० टक्के जागा (यामध्ये मंजूर प्रवेश क्षमतेच्या १५ टक्के अतिरिक्त जागा समाविष्ट

आहेत.) भाकृअप कोटयाकरिता राखीव आहेत. भाकृअप यांचेकडे नसलेले विषय किंवा भाकृअपचे मानांकन नसलेल्या विषयांची यादी **परिशिष्ट अे** मध्ये देण्यात आलेली आहे.

२. आचार्य पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशांतर्गत जागांची वाटणी (seat matrix) अंतिम होण्यापूर्वी कृषी विद्यापीठांकडून भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या कोटयातील रिक्त जागांची माहिती प्राप्त झाल्यास अशा रिक्त जागा विचारात घेऊनच जागांची वाटणी (seat matrix) अंतिम करण्यात येईल. अन्यथा अशा रिक्त जागा तिसऱ्या प्रवेश वाटप फेरीद्वारे उपलब्ध करून देण्यात येतील.

**२.३.२ आचार्य पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेचा विद्यापीठनिहाय गोषवारा.**

| अ. क्र. | विद्याशाखा | मफुकृवि, राहुरी | डॉ. पंदेकृवि, अकोला | वनामकृवि, परभणी | डॉ. बासाकोकृवि, दापोली | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | कृषी | ५६ | ३१ | ५२ | १६ | **१५५** |
| २. | उद्यानविद्या | ८ | १२ | ७ | ८ | ३५ |
| ३. | वनशास्त्र | -- | -- | -- | ०२ | ०२ |
| ४. | मत्स्यविज्ञान | -- | -- | -- | ११ | ११ |
| ५. | अन्न तंत्रज्ञान | -- | -- | १० | -- | १० |
| ६. | आण्विक जीवशास्त्र व जैवतंत्रज्ञान | -- | ३ | -- | -- | ३ |
| ७. | कृषी अभियांत्रिकी | १२ | १० | ७ | १२ | ४१ |
| ८. | काढणी पश्चात व्यवस्थापन | -- | -- | -- | ५ | ५ |
| | **एकूण** | **७६** | **५६** | **७६** | **५४** | **२६२** |

टिपः-

- सेवांतर्गत कर्मचाऱ्यांसाठी राखीव असलेली प्रवेश क्षमतेंतर्गत रिक्त जागा तिसऱ्या प्रवेश वाटप फेरीपूर्वी कृषी विद्यापीठाने कृषी परिषदेस कळविल्यास अशी रिक्त जागा तिसऱ्या प्रवेश वाटप फेरीद्वारे भरण्यात येईल.
- आचार्य पदवी अभ्यासक्रमातील प्रवेश क्षमतेमध्ये बदल / कोणत्याही सुधारणा करण्याचे अधिकार कृषी परिषद राखून ठेवत आहे.

## ३. उमेदवारांसाठी सूचना :

३.१ प्रवेशासाठी विहीत नमुन्यातील अर्ज ऑनलाईन भरण्यापूर्वी उमेदवारांनी माहितीपत्रक आणि प्रवेश अर्ज यांचे काळजीपूर्वक वाचन करावे.

३.२ (i) प्रत्येक अर्जदाराने **फक्त एकच प्रवेश अर्ज** 'मे. ॲनालिटीका बिझीनेस सोल्युशन्स, पुणे'च्या '**https://phd.agrimcaer.in**' या संकेतस्थळावर **'ऑन लाईन'** पध्दतीने भरावा. **उमेदवाराने एकापेक्षा जास्त प्रवेश अर्ज संकेतस्थळावर दाखल केल्यास शेवटचा परिपूर्ण भरलेला प्रवेश अर्ज ग्राह्य धरण्यात येईल.**

(ii) **प्रवेश अर्जाची प्रत** किं**वा इतर कोणतीही कागदपत्रे टपालाने / कुरीअरने किंवा हातबटवडयाने कृषी परिषद, कृषी विद्यापीठ किंवा मे. ॲनालिटीका बिझीनेस सोल्युशन्स, पुणे यापैकी कोठेही पाठवू नयेत.**

(iii) **संकेतस्थळावर प्रवेश अर्ज भरल्यानंतर स्वाक्षरी, उमेदवाराचे पासपोर्ट आकाराचे सध्याचे छायाचित्र आणि आवश्यक त्या सर्व कागदपत्रांच्या प्रती स्कॅन करून संकेतस्थळावर अपलोड कराव्यात.**

(iv) **खुल्या उमेदवारांसाठी तसेच महाराष्ट्राबाहेरील सर्व उमेदवारांसाठी रु.२०००/- तर महाराष्ट्रातील आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांसाठी (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती-अ, भटक्या जमाती-ब, क, ड, इतर मागासवर्गीय जाती, विशेष मागास प्रवर्ग, सामाजिक आणि शैक्षणिकदृष्टया मागासवर्ग, आर्थिक दुर्बल घटक, दिव्यांग व अनाथ) रु.१०००/- प्रवेश अर्ज शुल्क आहे. सदरचे शुल्क नेट बँकींग, डेबिट कार्ड किंवा क्रेडीट कार्ड द्वारे भरावे. प्रवेश अर्ज भरल्यानंतर असे शुल्क भरण्याची व्यवस्था संकेतस्थळावर केलेली आहे. सदरचे शुल्क ना परतावा आहे.**

३.३ **उमेदवाराने अर्जासोबत खाली दर्शविलेल्या कागदपत्रांच्या प्रती स्कॅन करून पुढील क्रमाने त्याच्या लॉग-इनद्वारे संकेतस्थळावर अपलोड कराव्यात.**

(अे) पात्रता परीक्षेचे गुणपत्रक / श्रेणी पत्रक तसेच महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाकडील सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील सामायिक प्रवेश परीक्षेचे गुणपत्रक.

(बी) (i) ज्या महाविद्यालयातून शेवटची परीक्षा उत्तीर्ण झाला आहे, ते महाविद्यालय सोडल्याचा दाखला [सदर दाखला उपलब्ध नसल्यास ऑनलाईन प्रवेश अर्ज दाखल करतेवेळी कुलसचिव / सहयोगी अधिष्ठाता यांच्या स्वाक्षरीचे पदव्युत्तर पदवी पूर्ण केली असल्याचे प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल. तथापि, प्रवेश फेरीद्वारे प्रवेशाचे वाटप झाल्यास संबंधित महाविद्यालयाकडे मूळ कागदपत्रे सादर करतेवेळी महाविद्यालय सोडल्याचा मूळ दाखला सादर करणे विद्यार्थ्यास अनिवार्य आहे. अन्यथा उमेदवाराचे प्रवेशाचे वाटप रद्द करण्यात

येईल.] किंवा उमेदवाराने इतर अभ्यासक्रमासाठी **(महाराष्ट्र राज्यातील कृषी विद्यापीठे वगळून)** प्रवेश घेतला असेल त्या महाविद्यालयाचे अधिकृत (Bonafide) प्रमाणपत्र.

(ii) महाराष्ट्र राज्याबाहेरील (Other State) उमेदवारांना महाविद्यालय सोडल्याचा दाखला (College Leaving Certificate) सादर करता येत नसेल, तर अशावेळेस त्या महाविद्यालयाकडील स्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate).

(iii) मागील शैक्षणिक वर्षात राज्यातील कृषी विद्यापीठांतर्गत आचार्य पदवी शिक्षण घेत असलेल्या उमेदवाराने प्रथम वर्ष आचार्य पदवी अभ्यासक्रमासाठी पुनश्च अर्ज केल्यास, **चालू शैक्षणिक वर्षासाठी पहिल्या वर्षात प्रवेश घेण्याकरिता चालू शैक्षणिक वर्षापूर्वी प्रवेश घेतलेल्या संबंधित महाविद्यालयाचे 'बोनाफाईड प्रमाणपत्र'.**

(iv) अशा उमेदवारास प्रवेश दिल्यास त्यास/तीस महाविद्यालय सोडल्याचा दाखला / स्थलांतराचे प्रमाणपत्र तीन महिन्यांच्या आंत सादर करणे आवश्यक आहे. सदर दाखला विहित मुदतीत सादर न केल्यास त्याचा/तिचा प्रवेश रद्द होऊ शकेल.

(v) राज्याबाहेरील काही कृषी विद्यापीठांमध्ये महाविद्यालय सोडल्याचा दाखला देण्यात येत नाही, मात्र प्रवेश मिळाल्यानंतर प्रवेशित महाविद्यालयाकडे असा दाखला परस्पर पाठविण्याची कार्यपध्दती आहे. अशाप्रकरणी संबंधित कृषी विद्यापीठाच्या कुलसचिव / अधिष्ठाता यांचे तशा आशयाचे पत्र.

(सी) (i) महाराष्ट्र राज्यातील सक्षम प्राधिका-याने दिलेले अधिवास प्रमाणपत्र किंवा जन्म ठिकाणाचा उल्लेख असलेले, महाविद्यालय / शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र किंवा सक्षम प्रधिका-याकडील जन्म दाखला.

(ii) बाहेरील राज्यातील उमेदवारांना सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले अधिवास प्रमाणपत्र / रहिवाशी दाखला / मूळ रहिवास व जन्मदाखला **/ नेटिव्हीटी सर्टिफिकेट**

(डी) **सन २०२३-२४ किंवा २०२४-२५ किंवा चालू वर्षातील वर्षातील तहसीलदार किंवा नायब तहसीलदार यांनी दिलेले शेतकरी असल्याबाबतचे प्रमाणपत्र**. या प्रमाणपत्राचा नमुना **<u>परिशिष्ट 'बी'</u>** येथे जोडला आहे. उमेदवार किंवा त्याचे / तिचे आई-वडील अथवा आजी/आजोबा (वडिलांचे आई-वडील) हे शेतजमीनधारक किंवा कूळ असून त्या जमिनीवरील शेतीव्दारे मिळणारे उत्पन्न हेच त्या कुटुंबाच्या उपजीविकेचे प्रमुख साधन आहे, असे या

प्रमाणपत्रामध्ये नमूद करणे आवश्यक आहे **किंवा तहसीलदार / नायब तहसीलदार यांनी दिलेले त्यांच्याकडील उपलब्ध असलेल्या विहित नमुन्यातील प्रमाणपत्र.**

(इ) राज्यातील **सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र.**

(एफ) मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपील क्र. ११२३४-४८/२०१७ संदर्भात दिलेल्या आदेशास अनुसरून अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), इतर मागासवर्गीय जाती, सामाजिक आणि शैक्षणिकदृष्टया मागासवर्ग या उमेदवारांचे जात पडताळणी प्रमाणपत्र.

(सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकिर्ण २०२५ / प्र.क्र.६८ / आरक्षण-५, दि.२६/८/२०२५, तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. सीबीसी-२०२५/प्र.क्र.१३१/मावक, दि. ४/९/२०२५, आणि सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन शुध्दीपत्रक क्र. सीबीसी-२०२५/प्र.क्र.१३१/मावक, दि. ५/९/२०२५ अन्वये सामाजिक आणि शैक्षणिकदृष्टया मागासवर्ग, इतर मागासवर्ग, अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी, प्रवेश अर्ज दाखल केल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांची मुदत देण्यात आलेली आहे. करिता सदर प्रवर्गाच्या ज्या उमेदवारांनी जात पडताळणी समितीकडे जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे, परंतु अद्याप जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झालेले नाही, अशा उमेदवारांनी जात वैधता प्रमाणपत्राच्या जागी तसा अर्ज केल्याबाबतची पावती अपलोड करावी. प्रवेश अर्ज दाखल करण्याचा अंतिम दि.२४/१२/२०२५ असल्याने यानंतर सहा महिने म्हणजेच दि.२३/०६/२०२६ पर्यंत अशा उमेदवारांनी जात वैधता प्रमाणपत्र दाखल करणे अनिवार्य राहील. अन्यथा अशा उमेदवारांचे प्रवेश रद्द होतील व त्याबाबत संबंधित उमेदवार जबाबदार राहतील.)

(जी) **विमुक्त जाती-अ, भटक्या जमाती-ब, क, ड , इतर मागासवर्गीय जाती, विशेष मागासवर्ग, सामाजिक आणि शैक्षणिकदृष्टया मागासवर्गातील उमेदवारांनी** सक्षम प्राधिकाऱ्याचे **दिनांक १ एप्रिल,२०२५ रोजी किंवा त्यानंतर दिलेले किंवा अर्ज ज्या दिनांकास दिला असेल, त्या दिनांकास ग्राह्य असलेले '<u>उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे (Non Creamy Layer)' प्रमाणपत्र.</u> खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांच्या जागांवरील प्रवेशासाठी महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. राआधो-४०१९/ प्र.क्र.३१ /१६-अ, दि.३१/५/२०२१ अन्वये विहित केलेल्या 'परिशिष्ट अ' मधील**

**नमुन्यातील प्रमाणपत्र. सदर प्रमाणपत्र चालू शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता ग्राह्य असावे. या प्रमाणपत्राचा विहित नमुना शीघ्र संदर्भासाठी परिशिष्ट 'सी' येथे देण्यात आलेला आहे.**

(एच) महाराष्ट्र राज्यातील जिल्हा पुनर्वसन अधिकारी किंवा शासनाने प्राधिकृत केलेला अधिकारी (प्राधिकृत केले असल्यास प्राधिकृत करण्यात आले असल्याच्या सक्षम अधिकाऱ्याच्या पत्रासह) यांनी, उमेदवार / वडील हे प्रकल्पग्रस्त आहेत व त्याच्या/तिच्या वडिलांची / पालकांची किंवा आजोबांची **शेतजमीन महाराष्ट्रातील** कृषी विद्यापीठे/ पाटबंधारे/ वीज /संरक्षण **प्रकल्पासाठी संपादित केलेली / झालेली आहे, असे प्रमाणपत्र.** सक्षम अधिकाऱ्याने दिलेल्या **प्रकल्पग्रस्ताच्या प्रमाणपत्रावर या सवलतीचा फायदा ज्याला द्यावयाचा आहे, त्याच्या नावाचा उल्लेख असणे आवश्यक आहे.**

(आय) अर्जदाराच्या आई / वडिलांचे **स्वातंत्र्य सैनिक असल्याबाबतचे मा. पंतप्रधान / मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र**. स्वातंत्र्य सैनिकाचा मुलगा / मुलगी किंवा त्यांचा मुलगा / मुलगी यांना या प्रमाणपत्राचा फायदा मिळेल; परंतु अशा परिस्थितीत **स्वातंत्र्य सैनिकाचे आणि जर स्वातंत्र्य सैनिक हयात नसल्यास स्वातंत्र्य सैनिकाच्या पती / पत्नीचे** रु.१०/- चा कोर्ट फी स्टॅम्प चिकटवलेल्या साध्या कागदावर 'उमेदवार हा स्वातंत्र्यसैनिकाच्या मुलाचा / मुलीचा मुलगा/ मुलगी असल्या'बाबतचे **प्रतिज्ञापत्र. (सदर प्रतिज्ञापत्र नोटरीकृत असावे.)**

(जे) **उमेदवाराचे वडील, सैनिक असल्यास** तशा आशयाचे **जिल्हा सैनिक बोर्ड किंवा संबंधित तुकडीचा प्रमुख सेनाधिकारी यांचे विहीत नमुन्यातील प्रमाणपत्र** अथवा **डिस्चार्ज प्रमाणपत्र.**

(के) **सेवेत असणा-या उमेदवारांसाठी संबंधित नियुक्ती अधिकाऱ्याचे चालू शैक्षणिक वर्षासाठीचे 'ना हरकत प्रमाणपत्र'.**

(एल) शारीरिकदृष्टया दिव्यांगत्व (अपंगत्व) प्रवर्गातून प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवाराने **प्राधिकृत अधिका-याचे** (जिल्हा शल्य चिकित्सक किंवा समतुल्य शासकीय रूग्णालय / वैद्यकीय मंडळ) **दिव्यांगत्वाबद्दलचे प्रमाणपत्र** जोडावे. (विकलांगतेची टक्केवारी ४० टक्क्यांपेक्षा कमी नसावी. तथापि, भारताचे राजपत्र दि.१४/०५/२०१९ मध्ये दिलेल्या नियमावलीतील विकलांगतेच्या कमाल टक्केवारीचे निकष लागू असतील. सदर राजपत्र संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.)

(एम) अनाथ प्रवर्गातून प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवाराने, संबंधित विभागाचे विभागीय उपायुक्त, महिला व बालविकास यांचे स्वाक्षरीचे छापील लेटर हेडवरील विहित नमुन्यातील 'अनाथ प्रमाणपत्र''.

३.४ **सर्व दृष्टीने परिपूर्ण भरलेला तसेच प्रवेश वेळापत्रकात दिलेल्या शेवटच्या तारखेस किंवा त्यापूर्वी प्राप्त झालेला अर्जच प्रवेशासाठी ग्राह्य धरला जाईल.**

३.५ **स्कॅन करून अप**लोड **केलेली कागदपत्रे वाचनीय असावीत. याची खातरजमा करूनच कागदपत्रे अपलोड करावीत. अपलोड केलेली कागदपत्रे वाचनीय नसल्यास ते ग्राह्य धरण्यात येणार नाहीत व त्याची जबाबदारी पूर्णतः उमेदवाराची असेल.**

उक्त अपलोड केलेल्या प्रतींच्या सत्यतेबाबत **परिशिष्ट 'डी'** येथील नमुन्यात स्वघोषणापत्र संकेतस्थळावर अपलोड करावे.

३.६ **खालीलपैकी कोणत्याही एका त्रुटीमुळे प्रवेश अर्ज रद्द करण्यात येईल.**

**(अे) (i) महाराष्ट्र राज्यातील सक्षम प्राधिका-याने दिलेले अधिवास प्रमाणपत्र किंवा जन्म ठिकाणाचा उल्लेख असलेले, महाविद्यालय / शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र किंवा सक्षम प्रधिका-याकडील जन्म दाखल्याची स्वयंसाक्षांकित प्रत संकेतस्थळावर अपलोड केली नसल्यास.**

**(ii) बाहेरील राज्यातील उमेदवारांनी अधिवास प्रमाणपत्र / रहिवाशी दाखला / मूळ रहिवास व जन्मदाखला / नेटिव्हीटी सर्टिफिकेट जोडले नसल्यास.**

**(बी) उमेदवाराचे पासपोर्ट आकाराचे सध्याचे छायाचित्र व स्वतःची स्वाक्षरी** संकेतस्थळावर अपलोड केली नसल्यास.

(सी) **पात्रता परीक्षेचे गुणपत्रक / श्रेणीपत्रकाच्या प्रती संकेतस्थळावर अपलोड केल्या नसल्यास.**

(डी) **महाविद्यालय सोडल्याचा दाखला [सदर दाखला उपलब्ध नसल्यास कुलसचिव / सहयोगी अधिष्ठाता यांच्या स्वाक्षरीचे पदव्युत्तर पदवी पूर्ण केली असल्याचे प्रमाणपत्र] / स्थलांतराच्या दाखल्याची प्रत संकेतस्थळावर अपलोड केली नसल्यास,** (उमेदवाराने या प्रवेशापूर्वी दुसऱ्या पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश घेतला असेल तर त्या महाविद्यालयाने दिलेल्या बोनाफाईड प्रमाणपत्राच्या आधारे प्रवेश दिला जाईल; परंतु, मूळ महाविद्यालय सोडल्याचा दाखला प्रवेश घेतल्यापासून ३ महिन्यांच्या आत सादर करणे बंधनकारक राहील.)

(इ) सेवेत असणा-या उमेदवाराने संबंधित **नियुक्ती प्राधिकाऱ्याचे ‘ना हरकत प्रमाणपत्र’ संकेतस्थळावर अपलोड केले नसल्यास.**

(एफ) **प्रवेश अर्जाचे विहित शुल्क न भरल्यास.**

**(जी) संकेतस्थळावर अपलोड केलेल्या प्रतींच्या सत्यतेबाबत स्वयंघोषणापत्र संकेतस्थळावर अपलोड केले नसल्यास.**

३.७ **आचार्य पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासंदर्भात गुणांच्या बाबतीत बरोबरी झाल्यास गुणज्येष्ठता (Merit) ठरविण्यासाठी खालील मार्गदर्शक तत्वांचा अवलंब करण्यात येईल.**

(अ) महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाकडील आचार्य पदवी सामायिक प्रवेश परीक्षेचे अधिकतम् गुण.

(ब) पदव्युत्तर परीक्षेतील **अधिकतम सीजीपीए.**

(क) पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी लागलेले एकूण वर्ष.

(ड) **वयाने मोठा** असलेला उमेदवार.

(इ) प्रथम ऑनलाईन प्रवेश अर्ज दाखल करण्याचा दिनांक व वेळ

३.८ **प्रवेश अर्ज व त्यासोबतची संबंधित कागदपत्रे संकेतस्थळावर अपलोड केल्यानंतर टपालाने / कुरीअरने / हातबटवडयाने कोणतीही अतिरिक्त कागदपत्रे स्वीकारली जाणार नाहीत.**

३.९ (१) उमेदवारांनी त्यांना पाहिजे असलेल्या महाविद्यालय / संस्थेमध्ये प्रवेश घेण्यासाठी प्राधान्यक्रमाने अर्जामध्ये विकल्प नमूद करावेत. त्यासाठी संबंधित महाविद्यालय / संस्थेच्या सांकेतांकांचा वापर करावा.

(२) उमेदवारांना सूचित करण्यात येते की, त्यांनी **जास्तीत जास्त महाविद्यालय / संस्थांचे विकल्प** नमूद करावेत.

**(३) एकदा विकल्प नमूद केल्यानंतर विकल्पात बदल करण्याची विनंती विचारात घेतली जाणार नाही.**

३.१० (i) उमेदवाराने सर्व रकान्यांमध्ये अचूक माहिती भरावी.

(ii) उमेदवाराने भरलेल्या अर्जामध्ये कोणत्याही प्रकारची **त्रुटी राहिल्यामुळे उमेदवाराची गुणवत्ता घसरल्यास, त्याबाबत 'मे. ॲनालिटीका बिझीनेस सोल्युशन्स, पुणे’ किंवा कृषी परिषद जबाबदार राहणार नाही.**

३.११ अंतिम गुणवत्ता यादी जाहीर झाल्यानंतर उपलब्ध जागा, प्राप्त गुण, लागू असलेले आरक्षण, बिंदुनामावली आणि इच्छुकांनी दिलेले विकल्प विचारात घेवून प्रवेश दिले जातील.

३.१२ उमेदवाराने दिलेल्या विकल्पानुसार **प्रथमतः राज्यस्तरावरील [ 'एम्' कोटा] उपलब्ध जागांमधून प्रवेशासाठी विचार केला जाईल. त्यानंतर विद्यापीठस्तरीय [ 'यु' कोटा] जागांवरील प्रवेशाबाबत विचार करण्यात येईल.**

३.१३ प्रवेशासाठी निवडलेल्या उमेद्‌वारांची **'एम्'** कोटा व **'यु'** कोटयातील गुणानुक्रमे यादी प्रवेश वेळापत्रकामध्ये नमूद केलेल्या दिनांकांना **www.mcaer.org** आणि **https://phd.agrimcaer.in** या संकेतस्थळांवर प्रसिध्द केली जाईल.

३.१४ प्रवेश घेण्यासंबंधीच्या **उमेदवारांसाठी महत्वाच्या सूचना परिशिष्ट 'ई'** मध्ये देण्यात आलेल्या आहेत.

३.१५ शासन परिपत्रक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.संकीर्ण-२०११/(१०३) /११)/ मशि-३, दि.१८/४/२०११ नुसार उमेदवाराने प्रवेश घेतेवेळी स्वच्छताविषयक बाबींसबंधी **परिशिष्ट 'एफ'** मध्ये माहिती देणे अनिवार्य आहे.

३.१६ शासन परिपत्रक, कृषी व पदुम विभाग, क्र. संकीर्ण-१५१७/प्र.क्र.१८५/६-अे, दि.५/६/२०१७ अनुसार ज्या उमेदवारांचे मतदार यादीमध्ये नाव नोंदविलेले नाही, अशा उमेदवारांनी मतदार यादीमध्ये नाव नोंदविण्याविषयी हमी पत्र व नमुना ६, ७, ८ व ८-अ व्यवस्थित भरून प्रवेश घेतेवेळी संबंधित महाविद्यालयाकडे जमा करावे.

३.१७ प्रवेश प्रक्रियेविषयक **कायदेशीर बाबी उद्‌भवल्यास इंग्रजी माहिती पुस्तिका ग्राह्य धरण्यात येईल.**

## ४. प्रवेश कार्यपध्दती :

४.१ उमेदवाराने प्रवेश प्रक्रियेसंबंधी माहितीपुस्तिकेत दिलेला सर्व मजकूर काळजीपूर्वक वाचावा.

४.२ 'मे. ॲनालिटीका बिझीनेस सोल्युशन्स, पुणे' यांच्यामार्फत कृषी परिषद, पुणे, राज्यातील कृषी विद्यापीठांकरिता प्रवेशप्रक्रिया राबवील.

**४.३** महाराष्ट्र कृषी विद्यापीठे अधिनियम, १९८३ च्या कलम ५ मधील तरतुदीनुसार आचार्य पदवी प्रवेशासाठी इच्छुक असणारे उमेदवार आणि त्यांच्या आई/वडिलांचे महाराष्ट्र राज्यातील वास्तव्य प्रवेश अर्ज दाखल करण्याच्या दिनांकाच्या १० वर्षे पूर्वीच्या कालावधीत किमान ३ वर्षे असणे आवश्यक असून असे उमेदवार प्रवेशासाठी पात्र समजण्यात येतील; तथापि, जे उमेदवार आणि त्यांच्या आई / वडिलांचे वास्तव्य मागील १० वर्षांच्या कालावधीत तीन वर्षांपेक्षा कमी असेल, असे उमेदवार राज्याबाहेरील उमेदवार म्हणून समजण्यात येतील व त्यांच्याकरिता प्रवेशांच्या जागा चारही कृषी विद्यापीठातील संबंधित विषयाच्या उपलब्ध जागांच्या २ टक्क्यापर्यंत मर्यादित असतील.

४.४ **भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली व बाहेरील राज्यातील उमेदवारांसाठी असलेल्या राखीव जागा वगळता उर्वरित जागांपैकी-**

| | |
|---|---|
| **(अ) प्रथम महाराष्ट्रातील सर्व कृषी विद्यापीठातील उमेदवारांसाठी** | **५० टक्के जागा- 'एम्' कोटा.** |
| **(ब) नंतर महाराष्ट्रातील ज्या विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रामधील महाविद्यालय/संस्था येथून उमेद्वार अर्हता परीक्षा उत्तीर्ण झाला असेल, अशा उमेदवारांसाठी** | **५० टक्के जागा- 'यु' कोटा.** |

४.५ **महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळामार्फत घेण्यात आलेल्या आचार्य पदवी सामायिक प्रवेश परीक्षेतील प्राप्त गुणांच्या ७० टक्के गुण तसेच पदव्युत्तर पदवी परीक्षेतील प्राप्त गुणांच्या ३० टक्के गुण आणि अधिभार- Weightages (असल्यास) या आधारे आचार्य पदवी प्रवेशासाठी गुणवत्ता निश्चित करण्यात येईल.**

४.६ ज्या उमेदवारांकडे महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र आहे किंवा ज्या उमेदवाराच्या महाविद्यालय सोडल्याच्या दाखल्यावर महाराष्ट्र राज्यातील जन्म ठिकाण आहे किंवा महाराष्ट्र राज्यातील सक्षम प्राधिका-याकडील जन्म दाखला आहे. मात्र त्याने पात्रता परीक्षा राज्याबाहेरून उत्तीर्ण केली आहे, अशा उमेदवाराचा प्रवेशासाठी विचार फक्त 'एम्' कोटयाकरिता करण्यात येईल.

४.७ **सर्व प्रवेश गुणवत्तेनुसार आणि तात्पुरत्या स्वरुपाचे असतील. शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग, क्र.** मकृप-१०२१/ प्र.क्र.१४५/७-अे, दि.१५/११/२०२१ अन्**वये विहित करण्यात आलेल्या कार्यपध्दतीनुसार विषयांचे वाटप करण्यात येईल.** तसेच शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग, क्र. मकृवि २०१०/प्र.क्र. १५५ / ७अे, दि.२०/१०/२०११ अन्वये शासनाने, कृषी विद्यापीठांतर्गत पदवी, पदव्युत्तर व आचार्य पदवी अभ्यासक्रमामध्ये सामाजिक आरक्षणाच्या वाटपाची कार्यपध्दती निश्चित केलेली आहे. याधर्तीवर चारही कृषी विद्यापीठातील संबंधित विषयाच्या उपलब्ध जागांची संख्या विचारात घेऊन सामाजिक आरक्षणाच्या वाटपाची कार्यपध्दती अनुसरण्यात येईल.

४.८ (१) **https://phd.agrimcaer.in** आणि **www.mcaer.org** या संकेतस्थळावर गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्यात येईल. उमेदवार या संकेतस्थळावर गुणवत्ता यादी पाहू शकतील.

(२) **उमेदवारांना टपालाद्वारे त्यांच्या गुणवत्तायादीबाबत स्वतंत्रपणे कळविले जाणार नाही.**

**४.९** (१) गुणवत्ता यादीबाबत तक्रार असलेल्या अर्जदारांनी, प्रवेश कार्यक्रमामध्ये नमूद केलेल्या दिनांकाला किंवा त्या दिनांकापूर्वी त्यांच्या तक्रारी, त्यांच्या 'लॉग इन आय.डी.' व 'पासवर्ड'च्या आधारे 'ऑन लाईन'द्वारे सादर कराव्यात.

(२) **या मुदतीत उमेदवारांचा तक्रार अर्ज ऑनलाईनद्वारे प्राप्त न झाल्यास त्याचे/तिचे प्रकरण विचारात घेतले जाणार नाही.**

४.१० **(१) उमेदवाराने त्याचा 'लॉग इन', 'पासवर्ड' वापरून संकेतस्थळावरून त्याला देण्यात येणाऱ्या तात्पुरत्या प्रवेश वाटप पत्राची मुद्रित प्रत प्राप्त करून घेऊन प्रवेश दिलेल्या महाविद्यालयात स्वतः सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रती व सहपत्रांसह विहित दिनांकास अथवा त्यापूर्वी उपस्थित रहावे. गंभीर वैद्यकीय कारणास्तव उमेदवार उपस्थित राहू शकत नसल्यास परिशिष्ट- 'जी' येथील प्राधिकार पत्राप्रमाणे उपस्थिती नोंदवावी. अन्यथा असा उमेदवार प्रवेशास अनुपस्थित राहिला असे समजण्यात येऊन त्याचा प्रवेश रद्द समजण्यात येईल.**

**(२)** असा उमेद्वार त्यापुढील **'**ऑनलाईन**'** प्रवेश फे-यांसाठी पात्र ठरणार नाही; मात्र **'**ऑनलाईन महाविद्यालयनिहाय प्रवेश वाटप फेरी**'** या फेरीसाठी त्याचा / तिचा विचार केला जाऊ शकेल.

४.११ अ) प्रवेश माहितीपुस्तिकेत नमूद केलेल्या तारखेस उमेदवाराला उपलब्ध रिक्त जागांवर गुणवत्तेनुसार प्रवेश दिला जाईल.

ब) **प्रवेशानंतर कोणत्याही वेळी, उमेदवाराने खोटी माहिती पुरवून प्रवेश घेतला आहे, असे आढळून आल्यास असा प्रवेश विद्यापीठ रद्द करील.**

क) एखाद्या प्रकरणी विद्यापीठाने अशी कारवाई केली नसल्याचे निदर्शनास आल्यास असा प्रवेश रद्द करण्यासाठी महासंचालक, कृषी परिषद हे सक्षम असतील.

ड) प्रवेश फेऱ्यांच्या दरम्यान किंवा प्रवेशानंतर कोणत्याही वेळी संगणकप्रणालीमधील तांत्रिक बिघाडामुळे किंवा इतर कोणत्याही चुकीमुळे प्रवेश झाला असे आढळून आल्यास अशा उमेदवाराचा प्रवेश महासंचालक, कृषी परिषद हे रद्द करतील.

४.१२ (i) अतिरिक्त दिलेले गुण चुकीचे दर्शविले गेले असल्याचे प्रवेश घेतेवेळी मूळ कागदपत्रे व प्रमाणपत्रांच्या छाननीच्या वेळी निदर्शनास आल्यास, अशा उमेदवाराचा संबंधित महाविद्यालय / संस्थेतील प्रवेश ग्राह्य धरण्यात येणार नाही.

(ii) अधिष्ठाता / सहयोगी अधिष्ठाता यांनी याबाबतची वस्तुस्थिती 'मे. ॲनालिटीका बिझीनेस सोल्युशन्स, पुणे' / कृषी परिषद कार्यालय यांना ई-मेल, दूरध्वनी किंवा फॅक्सद्वारे तात्काळ कळवावी.

(iii) 'मे. ॲनालिटीका बिझीनेस सोल्युशन्स, पुणे' द्वारा अंतिम यादी पुन्हा सुधारित केल्यानंतर सदर उमेदवार त्याच्या प्राप्त गुणानुसार नवीन महाविद्यालय / संस्थेतील प्रवेशास पात्र राहील.

४.१३ (i) एखाद्या उमेदवाराला प्रवेशाबाबत तक्रार करायची असल्यास, **संबंधित प्रवेश वाटप फेरीच्या कालावधीतच कृषी परिषदेचे महासंचालक** यांच्याकडे उमेदवार तक्रार अर्ज दाखल करू शकेल.

(ii) अशा तक्रारीबाबत तात्काळ शहानिशा करून यथायोग्य कार्यवाही करण्यास महासंचालक, कृषी परिषद हे सक्षम असतील.

४.१४ विविध अभ्यासक्रमासाठी घेतलेला प्रवेश अंतिम राहील. प्रवेश घेतलेला असा उमेदवार विद्यापीठ / महाविद्यालय / अभ्यासक्रम / विषय यामध्ये कोणताही बदल करण्यास पात्र राहणार नाही.

४.१५ **कोणत्याही उमेदवाराची असा प्रवेश नाकारण्याची इच्छा असल्यास** आणि पुढील प्रवेश वाटप फेरीसाठी त्याचा/तिचा विचार व्हावा, असे वाटत असल्यास, त्याने / तिने **संकेतस्थळावर लॉग-इन मध्ये डेबीट कार्ड / क्रेडीट कार्ड / नेट बँकींगद्वारे रू.२००/- ऑनलाईन अदा करून प्रवेश नाकारता येईल.**

**४.१६ एखाद्या विद्यार्थ्याने रु.२००/- फी भरुन त्याचा / तिचा प्रवेश नाकारला नाही किंवा प्रवेश वाटपानुसार प्रवेशही घेतला नाही तर त्याचा / तिचा '**तिसरी प्रवेश वाटप फेरी**' या फेरीखेरीज नंतरच्या प्रवेश फेरीसाठी विचार केला जाणार नाही.**

**४.१७** प्रवेश वाटपानुसार प्रवेश घेतल्यानंतर प्रवेश प्रक्रियेच्या कालावधीमध्ये विद्यार्थ्याने प्रवेश रद्द / नाकारल्यास असा विद्यार्थी प्रवेश रद्द / नाकारलेला विकल्प वगळता पुढील ऑनलाईन प्रवेश फेऱ्यांद्वारे इतर विकल्पांकरिता प्रवेशासाठी पात्र असेल. प्रवेश नाकारण्यासाठी दिलेल्या कालावधीमध्ये प्रवेश रद्द करता येतील.

**४.१८ प्रवेश वाटपानुसार प्रवेश घेतल्यानंतर विद्यार्थ्याने प्रवेश रद्द केल्यास असा विद्यार्थी प्रवेश रद्द केलेला विकल्प वगळता पुढील ऑनलाईन प्रवेश फेऱ्यांद्वारे इतर विकल्पांकरिता प्रवेशासाठी पात्र असेल. प्रवेश रद्द शुल्काचा परतावा खालीलप्रमाणे असेल.**

(i) प्रवेशाची नोंदणी केल्यानंतर व वर्ग सुरु होण्यापूर्वी विद्यार्थ्याने प्रवेश रद्द केल्यास, विद्यार्थ्याकडून **प्रवेश प्रक्रिया शुल्कापोटी कमाल रू.१०००/- रक्कम कपात करण्यात येईल.**

(ii) **प्रवेशाची नोंदणी केल्यानंतर व वर्ग सुरु झाल्यानंतर विद्यार्थ्याने प्रवेश रद्द केल्यास वर्ग सुरु झालेल्या महिन्यापासून ज्या महिन्यामध्ये प्रवेश रद्द केला असेल, त्या महिन्यापर्यंत दरमहा होणारे सत्र आधारित शिक्षण शुल्क व दरमहा होणारे वसतीगृह शुल्क** (वसतीगृह उपलब्ध करून दिलेले असल्यास) संबंधित विद्यार्थ्याकडून **वसूल करण्यात येईल.**

(iii) वर्ग सुरु झाल्यानंतर राबविण्यात आलेल्या प्रवेश वाटप फेरीद्वारे प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्याने नोंदणी करून प्रवेश रद्द केल्यास, **नोंदणी केलेल्या तारखेच्या महिन्यापासून ज्या महिन्यामध्ये प्रवेश रद्द केला असेल, त्या महिन्यापर्यंत दरमहा होणारे सत्र आधारित शिक्षण शुल्क व दरमहा होणारे वसतीगृह शुल्क (वसतीगृह उपलब्ध करून दिलेले असल्यास) संबंधित विद्यार्थ्याकडून वसूल करण्यात येईल.**

४.१९ प्रवेश प्रक्रियेसंबंधीची तसेच राज्यस्तरीय ('एम' कोटा) व विद्यापीठस्तरीय ('यु' कोटा) ची गुणवत्ता यादी आणि प्रवेश फेऱ्यांप्रमाणे प्रवेशासंबंधीची सद्यस्थिती याबाबतची माहिती **https://phd.agrimcaer.in** आणि **www.mcaer.org** या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

४.२० प्रवेश प्रक्रियेसंदर्भात महाविद्यालय संस्थांचे अधिष्ठाता / सहयोगी अधिष्ठाता यांच्यासाठी महत्वाच्या सूचना **परिशिष्ट 'एच'** येथे दिलेल्या आहेत.

**४.२१** उमेदवाराचा दुर्लक्षितपणा, दिरंगाई, कोणत्याही प्रकारचे तांत्रिक बिघाड किंवा त्याच्या इतर खाजगी कारणांमुळे तो प्रवेशापासून वंचित राहिल्याबाबत **कोणत्याही प्रकारची तक्रार विचारात घेतली जाणार नाही.**

## ५.	राखीव जागांचा तपशील.

महाराष्ट्र कृषी विद्यापीठे अधिनियम, १९८३ मधील तरतुदी, तसेच वेळोवेळी शासन निर्णयाद्वारे निर्देशित केल्याप्रमाणे विशिष्ट जागा, महाविद्यालयांमधील प्रवेशासाठी राखून ठेवण्यात आल्या आहेत-

| अ. क्र. | सामाजिक आरक्षण | टक्केवारी |
|---|---|---|
| (१) | अनुसूचित जाती / नवबौध्द (एस्सी) | १३ |
| (२) | अनुसूचित जमाती (एस्टी ) | ०७ |
| (३) | विमुक्त जाती (अ) (व्हीजे -ए) (१४ व इतर) | ०३ |
| (४) | भटक्या जमाती (ब) (एन्टी-बी) (१९९० पूर्वीच्या सूचीप्रमाणे २८ व इतर) | २.५ |
| (५) | भटक्या जमाती (क) (एन्टी - सी ) | ३.५ |
| (६) | भटकया जमाती (ड) (एन्टी - डी) (वंजार, वंजारी, वंजारा) | ०२ |
| (७) | इतर मागास वर्गीय (ओबीसी) | १९ |
| (८) | सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्ग (एसईबीसी) | १० |
| | **एकूण** | **६०** |

| अ. क्र. | विशेष आरक्षण | टक्केवारी |
|---|---|---|
| (१०) | स्वातंत्र्य सैनिकाचे पाल्य (एफ्एफ्) | २ |
| (११) | दिव्यांग (अपंग) (कमी दिसणे, कमी ऐकणे, चालणे व्यंगत्व किंवा मणक्याचे व्यंगत्व) (पीएच) | ५ |
| (१२) | आजी व माजी सैनिकांची मुले (डीपी) | २ |
| (१३) | प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या व्यक्तींची मुले. (पीएपी) महाराष्ट्र प्रकल्प पुनर्वसन अधिनियम, १९७६ प्रमाणे प्रकल्पपीडित. | ४ |
| (१४) | शेतकरी व विहित किमान अर्हता असलेले किंवा कृषीविषयक अनुभव असलेली शेतक-यांची मुले. (अेजी) | ६ |
| (१५) | महिला | ३० |
| | **इतर** | |
| (१६) | ज्या तारखेला प्रवेश मागितला असेल त्या तारखेच्या लगतपूर्वीच्या १० वर्षे मुदतीमध्ये किमान तीन वर्षे ज्या व्यक्ती व ज्याच्या आईवडिलांनी या राज्यात निवास केलेला नसेल, अशा व्यक्ती. (ओएस) | २ |
| (१७) | अनाथ मुले | १ |

**इतर**

| | | |
|---|---|---|
| (९) | आर्थिक दुर्बल घटक (इडब्ल्युएस) | १० |

**टीप :**

५.१ विशेष आरक्षणांतर्गत अ.क्र. १० ते १५ येथील विशेष आरक्षण अ.क्र.१ ते ९ येथील प्रवर्गामध्ये समाविष्ट आहे.

५.२ अनाथांसाठी आरक्षित जागेवर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश तो ज्या प्रवर्गाचा आहे त्या प्रवर्गात करण्यात येईल.

५.३ विशेष आरक्षणांतर्गत अ.क्र. १५ येथील महिलांच्या विशेष आरक्षणास त्या त्या प्रवर्गासाठी विहित करण्यात आलेल्या टक्केवारीनुसार वाटा निश्चितपणे मिळावा यासाठी सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.३१/९८/१६-अ, दि.१६/३/१९९९ मध्ये नमूद केलेली कार्यपध्दती अनुसरण्यात येईल. प्रस्तुत शासन परिपत्रक कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.

५.४ 'विशेष मागास प्रवर्गीय' उमेदवारांची जात, सुरुवातीस ज्या 'इतर मागास प्रवर्गा'मध्ये समाविष्ट होती, त्या 'इतर मागास प्रवर्गा'च्या आरक्षणासाठी असा उमेदवार पात्र समजण्यात येईल.

५.५ भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या जागा, बाहेरील राज्यातील जागा वगळून उर्वरित जागा विचारात घेऊन महाराष्ट्र / विद्यापीठ कोटयांतर्गत सामाजिक व इतर आरक्षण निश्चित करण्यात येईल.

५.६ चारही कृषी विद्यापीठातील संबंधित विषयाच्या उपलब्ध जागा विचारात घेऊन जागांचे वाटप (Seat Matrix) निश्चित करण्यात आलेले आहे. त्यानुसार बिंदुनामावली निश्चित करण्यात आलेली आहे. याबाबतचा तपशील **www.mcaer.org** आणि **https://phd.agrimcaer.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

५.७ महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे वरील आरक्षणाची अंमलबजावणी तथा बदल करण्यात येतील.

५.८ प्रवेश प्रक्रियेदरम्यान एखाद्या आरक्षित संवर्गामध्ये उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर जागा शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग, क्र. मकृवि २०१०/प्र.क्र. १५५ / ७ अे, दि.२०/१०/२०११ मधील कार्यपध्दतीप्रमाणे भरण्यात येतील. सदर शासन निर्णयामध्ये आरक्षित जागांची सरमिसळ करण्याची कार्यपध्दती नमूद करण्यात आलेली आहे. यानुसार आरक्षित जागांची सरमिसळ केल्यानंतर या एकत्रित जागांना 'आरक्षित रूपांतरीत' (Convert to Reserve) (CR) संबोधण्यात येईल. या जागांवर सर्व सामाजिक प्रवर्गातील उमेदवार पात्र असतील. आरक्षित रूपांतरीत जागांवर उमेदवार प्राप्त न झाल्यास अशा जागा खुल्या वर्गासाठी रूपांतरीत करण्यात येतात. या जागांना 'खुला रूपांतरीत' (Convert to Open) (CO) संबोधण्यात येईल. या जागांवर महाराष्ट्रातील सर्व उमेदवार पात्र असतील.

५.९ आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी खुल्या प्रवर्गातील जागा आरक्षित करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतर्गत उमेदवार प्राप्त न झाल्यास सदर जागा खुल्या प्रवर्गात रुपांतरीत करण्यात येतील.

**५.१०** बाहेरील राज्यातील उमेदवारांना २ टक्के आरक्षणाची तरतूद आहे. मात्र विषयनिहाय प्रवेश क्षमता कमी असल्याने सदर उमेदवारांना जागा उपलब्ध होत नाहीत. करिता राज्यातील उमेदवार प्राप्त न झाल्यास अशा जागा तिसऱ्या (शेवटच्या) प्रवेश फेरीद्वारे बाहेरील राज्यातील उमेदवारांना उपलब्ध करून देण्यात येतील.

**५.११** सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम १६ दि.२६/२/२०२४, महाराष्ट्र राज्यातील सामाजिक आणि शैक्षणिकदृष्टया मागासवर्गांकरिता आरक्षण अधिनियम, २०२४ अन्वये अल्पसंख्यांक संस्थांव्यतिरिक्त इतर शैक्षणिक संस्था तसेच खाजगी शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशाच्या एकूण जागांमध्ये १० टक्के जागा सामाजिक आणि शैक्षणिकदृष्टया मागासवर्गांकरिता स्वतंत्रपणे राखून ठेवण्यात आलेल्या आहेत. तथापि, सदर आरक्षण हे मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल असलेल्या रिट याचिका क्र.३४६८/२०२४ व इतर मधील भविष्यातील निर्णयास अधीन राहील.

## ६. अधिभार

फक्त 'नास' [NAAS , National Academy of Agricultural Sciences] च्या समायोजित यादीमधील गुणप्राप्त नियतकालिकामध्ये प्रकाशित झालेल्या संशोधनपर लेखासाठी प्रत्येकी ०.०५, दहा बिंदू मापन मध्ये अतिरिक्त गुण देण्यात येतील. ज्या नियतकालिकामध्ये संशोधनपर लेख प्रकाशित झाला आहे, अशा नियतकालिकाचे मुखपृष्ठ, अनुक्रमणिका आणि संशोधन लेखाचे पहिले पृष्ठ जोडावे.

**जास्तीत जास्त अतिरिक्त गुणांची मर्यादा ०.२४ पेक्षा जास्त असणार नाही.**

## ७. शिक्षण पध्दत :

- ❖ राज्यातील कृषी विद्यापीठांमध्ये 'विषय - अधिभार पध्दती'ने प्रत्येक शैक्षणिक वर्ष दोन सत्रांमध्ये विभागले आहे आणि २० आठवडयांपेक्षा कमी कालावधी नसलेल्या कालावधीस 'षण्मासिक सत्र' असे म्हणतात.
- ❖ शैक्षणिक कार्यक्रमामध्ये शिकविले जाणारे विषय निरनिराळया सत्रांमध्ये विभागले जाऊन वर्गातील व्याख्याने, प्रात्याक्षिके / शेतावरील प्रात्यक्षिके, ग्रंथालयातील वाचन व गृहपाठ इत्यादीप्रकारे शिकविले जातात.
- ❖ विद्यार्थी / विद्यार्थिनी, विषयाची निवड, घ्यावयाचे एकूण अधिभार, विद्यार्थ्यांच्या सल्ला समितीच्या मार्गदर्शनाखाली प्रचलित नियमाप्रमाणे आणि विद्यार्थ्यांची / विद्यार्थिनींची शैक्षणिक प्रगती पाहून करतो / करते.

- ❖ विद्यार्थ्याची / विद्यार्थिनींची शैक्षणिक प्रगती समाधानकारक नसेल तर तो काही विषय ज्या वेळी शिकविण्यासाठी उपलब्ध असतील त्या वेळी पुन्हा घेऊ शकतो / शकते.
- ❖ शैक्षणिक नियमावलीमध्ये आवश्यकतेनुसार वेळोवेळी बदल करून सुधारीत शैक्षणिक नियमावली तयार करण्यात येते. सुधारीत शैक्षणिक नियमावली शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना लागू असते.

## ८. नोंदणी

८.१ अधिष्ठाता, पदव्युत्तर संस्था किंवा महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता यांनी प्रवेश अर्ज आणि मूळ प्रमाणपत्रे तपासल्यानंतर विद्यार्थ्यास नोंदणी करण्यासाठी परवानगी देण्यात येते. या नोंदणीसाठी खालील बाबींचा क्रमशः समावेश होतो.

(१) अधिष्ठाता, पदव्युत्तर संस्थेचे कार्यालय किंवा संबंधित महाविद्यालयाच्या सहयोगी अधिष्ठाता यांच्या कार्यालयात शुल्क भरणे .

(२) सल्लागार समिती आणि विभाग प्रमुख यांच्या सल्लामसलतीने विद्यार्थ्याची विविध विषयात नोंदणी.

(३) विषय नोंदणी फॉर्म पूर्ण करुन विद्यार्थी, प्राध्यापक, मार्गदर्शक आणि विभाग प्रमुखांच्या सहीनिशी त्याच दिवशी किंवा विहीत केलेल्या वेळेपर्यंत अधिष्ठाता, पदव्युत्तर संस्था किंवा संबंधित महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता यांचेकडे जमा करणे. अन्यथा विद्यार्थ्याची नोंदणी अवैध ठरविली जाते.

## ९. वैद्यकीय तपासणी

- ❖ प्रथम वर्षात प्रवेशित प्रत्येक विद्यार्थ्यास विद्यापीठ / अधिष्ठाता / सहयोगी अधिष्ठाता यांचे निर्देशानुसार जिल्हा शल्यचिकित्सक / ग्रामीण वैद्यकीय अधिकारी / प्राथमिक स्वास्थ्य केंद्र यांच्याकडून पहिले सत्र संपण्यापूर्वी वैद्यकीय तपासणी करून घेणे अनिवार्य आहे.
- ❖ वैद्यकीय तपासणीत विद्यार्थ्यामध्ये व्यंग आढळून आल्यास संस्थेचे / महाविद्यालयाचे अधिष्ठाता / सहयोगी अधिष्ठाता संबंधित विद्यार्थ्यास आणि त्याच्या आई - वडील / पालक यांना वैद्यकीय सुधारणेसाठी कळवतील.
- ❖ **विद्यार्थी वैद्यकीयदृष्टया अपात्र ठरल्यास त्यास विद्यापीठातून काढून टाकण्यात येईल.**
- ❖ अशी प्रकरणे कुलसचिव यांना पुढील कार्यवाहीस्तव सादर करण्यात येतील.

❖ विद्यापीठ / अधिष्ठाता / सहयोगी अधिष्ठाता यांनी आयोजित केलेल्या वैद्यकीय तपासणीसाठी विद्यार्थी गैरहजर राहिल्यास विद्यार्थ्याला स्वखर्चाने प्राधिकृत वैद्यकीय अधिकाऱ्याकडून तपासणी करुन तपासणी अहवाल विहित केलेल्या मुदतीमध्ये महाविद्यालयास सुपूर्द करावा लागेल.

❖ **एखाद्या विद्यार्थ्याने वैद्यकीय तपासणी अहवाल विहित मुदतीत सादर केला नाही, तर अशा विद्यार्थ्याचा निकाल घोषित केला जाणार नाही.**

## १०. उपस्थिती

❖ प्रत्येक विद्यार्थ्यास वर्गात, प्रात्यक्षिक , ग्रंथालयातील काम, कृषी विस्तार शिक्षण संबंधी भेटी, शैक्षणिक सहली आणि प्राध्यापक व संबंधीत शिक्षक यांच्या बैठकीस हजर राहाणे आवश्यक आहे.

❖ **एखाद्या विद्यार्थ्याची हजेरी ८० टक्यापेक्षा कमी असल्यास त्याला त्या सत्राची परीक्षा देण्यासाठी अपात्र ठरविण्यात येईल** व त्या विषयात अनुत्तीर्ण असा शेरा दिला जाईल (एफ् ग्रेड).

❖ अशा विद्यार्थ्यास त्या विषयासाठी पुन्हा नोंदणी करावी लागेल.

## ११. खेळ आणि इतर कार्यक्रम

प्रत्येक महाविद्यालयात क्रीडा आणि त्यासंबंधी कार्यक्रम राबविण्यासाठी सोयी सुविधा उपलब्ध आहेत.

## १२. वसतीगृह

काही मर्यादित संख्येपर्यंत विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयांकडे वसतीगृहाची सोय उपलब्ध आहे. वसतीगृहाची सुविधा गुणवत्तेवर आधारीत आहे. (वसतीगृह उपलब्धतेच्या अटीवर)

## १३. पदके, नगदी बक्षीसे आणि पारितोषिके.

उच्चत्तम गुणवत्ताधारक पदव्युत्तर विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या नियमानुसार पदके, नगदी बक्षीसे आणि पारितोषिके देण्यात येतात.

## १४. शिष्यवृत्ती आणि सवलती.

शासकीय नियमानुसार आचार्य पदवी अभ्यासक्रमास ज्या शैक्षणिक सवलती / शिष्यवृत्ती / शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती अनुज्ञेय आहे, त्या देय असतील.

**शिष्यवृत्तीसंदर्भात ठळक सूचनाः-**

- प्रवेश निश्चित झालेल्या अनुसूचित जाती व विविध मागास प्रवर्गातील तसेच आर्थिक मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी राज्य शासनामार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध शिष्यवृत्या / फ्रिशिप इत्यादी योजनांकरिता राज्य शासनाच्या https:/mahadbt.maharashtra.gov.in/ या पोर्टलवर जाऊन योजनेच्या निकषानुसार ऑनलाईन अर्ज नोंदणीकृत करणे आवश्यक आहे.

- ऑनलाईन शिष्यवृत्या / फ्रिशिप करिता विद्यार्थ्यांनी प्रवेश प्रक्रियेद्वारे निर्धारित केलेल्या महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांनी अंतिम प्रवेश घेतलेल्या तारखेपासून पुढील एक महिन्याच्या आत महाडिबीटी पोर्टलवर शिष्यवृत्या / फ्रिशिप इत्यादीकरिता परिपूर्ण अर्ज करणे आवश्यक आहे.

**१५. वर्तणूक आणि शिस्त**

(१) विद्यापीठामध्ये वेळोवेळी सुधारित व अस्तित्वात असलेल्या नियम व विनियमानुसार कॉपी प्रकरणे आणि गैरवर्तणुकीची प्रकरणे हाताळली जातात.

(२) विद्यापीठ संवैधानिक नियमावली, १९९० मध्ये केलेल्या तरतुदीन्वये **महाविद्यालयातील विद्यार्थी, रॅगिंग, अपहरण आणि इतर गैरशिस्तीच्या प्रकरणात आढळून आल्यास त्यास त्या संस्था / महाविद्यालयाचे अधिष्ठाता / सहयोगी अधिष्ठाता पूर्वसूचना न देता महाविद्यालयातून तसेच वसतिगृहातून ताबडतोब निलंबित करतील** आणि अशा विद्यार्थ्यास उप महासंचालक (शिक्षण), पत्र क्र. ६(२९)/२००७ ए व पी. दि.१८/१/०८ नुसार **मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांनी विशेष याचिका अपील (सी) (सन २००४ चे (सी) [२४२९५ व २४२९६-९९] मध्ये दि. १०/१२/२००७ रोजी दिलेले आदेश** आणि कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई पत्र क्र. अेजीयु-२००९/प्र.क्र.५८/७-अे, दि.६/५/२००९ नुसार, **माननीय कुलगुरु यांच्या आदेशाप्रमाणे महाविद्यालयातून काढून टाकण्यात येईल.**

(३) महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेने केलेल्या नियम व विनियमांचे पालन करणे विद्यार्थ्यांवर बंधनकारक राहील.

(४) **कोणत्याहीप्रकारची बेशिस्त किंवा गैरवर्तणूक ही 'उच्च शिक्षण संस्थांमधील होणा-या रॅगिंगवर नियंत्रण ठेवण्यासाठी विद्यापीठ अनुदान अयोगाचे विनियमन,२००९' च्या तरतुदीनुसार शिक्षापात्र गुन्हा ठरते.**

(५) रॅगिंगविरोधी कायदा : रॅगिंगच्या प्रकरणामध्ये २४ X ७ रॅगिंगविरोधी कायदेशीर मदत मिळण्यासाठी **१८००-१८०-५५२२** या टोल-फ्री क्रमांकावर संपर्क साधावा. ई-मेलः'**helpline@antiragging.net**' आणि संकेतस्थळ : '**http://www.ugc.ac.in**'

(६) प्रत्येक विद्यार्थी आणि त्याचे आई-वडील / पालक यांनी **'उच्च शिक्षण संस्थांमधील होणा-या रॅगिंगवर नियंत्रण ठेवण्यासाठी विद्यापीठ अनुदान अयोगाचे विनियमन,२००९'** मधील तरतुदींचे आम्ही पालन करू,' असे **परिशिष्ट 'आय'** येथील प्रतिज्ञापत्र देणे गरजेचे आहे. तसेच आम्ही शैक्षणिक संस्थांमध्ये वसतीगृह परिसर आणि विद्यापीठ परिसरामध्ये शिस्त व वर्तणूक चांगली ठेऊ अशीदेखील खात्री देणे आवश्यक आहे.

## १६. शुल्क

**आचार्य पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी भरावयाच्या शुल्काचा तपशील (रुपयांमध्ये)**

| अ. क्र. | बाब | सत्र १ | सत्र २ |
|---|---|---|---|
| | **अ) महाविद्यालय / संस्था शुल्क** | | |
| १ | शैक्षणिक शुल्क | १२००० | १२००० |
| २ | नोंदणी शुल्क | ५०० | ५०० |
| ३ | पात्रता शुल्क# | ५०० / ८०० ⊗ | -- |
| ४ | हमी शुल्क | २०००© | -- |
| ५ | ग्रंथालय शुल्क | १००० | १००० |
| ६ | विद्यार्थी परिषद कार्यक्रमांतर्गत वर्गणी | | |
| | १) खेळ,जिमखाना व इतर उपक्रम | १००० | १००० |
| | २) विद्यार्थी सहकारी संस्था (भाग भांडवल + सभासद शुल्क) | २००# | -- |
| | ३) वार्षिक पारितोषिक वितरण कार्यक्रम | ८०० | -- |
| | ४) महाविद्यालय / संस्था नियतकालिक | ४०० | -- |
| | ५) 'क्रीडा महोत्सव' क्रीडा शुल्क | १०० | -- |
| ७ | वैद्यकीय तपासणी शुल्क | २०० | -- |
| ८ | ओळख पत्र | १००# | -- |
| ९ | विद्यार्थी मदत निधी | २००# | -- |
| १० | गुण पत्रिका शुल्क | २०० | २०० |
| ११ | परीक्षा शुल्क | ३५०० | - |
| १२ | विद्यार्थी सुरक्षा विमा हप्ता | १०० | -- |
| १३ | प्रबंध तपासणी शुल्क | -- | ५०००# |
| | एकूण (अ) | २२८०० + [३००⊗] | १९७०० |
| | **(ब) वसतीगृह** | | |
| १ | वसतीगृह हमी रक्कम | ३०००© | -- |
| २ | देखभाल खर्च | ३००० | ३००० |
| ३ | विद्युत देयक | ३००० | ३००० |
| ४ | खाणावळ अनामत रक्कम | २०००© | -- |
| | एकूण (ब) | ११००० | ६००० |
| | **एकूण (अ+ब)** | **३३८०० + [३००⊗]** | **२५७००** |

**वरील शुल्क ऑनलाईनद्वारे स्वीकारले जाईल.**

**टीप :**

⊗ पात्रता परीक्षा महाराष्ट्र राज्याबाहेरून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी भरावयाचे शुल्क.

© विद्यार्थ्यांनी महाविद्यालय /संस्था / वसतीगृह सोडतांनाचे परतावा शुल्क.

# हे शुल्क विद्यार्थ्यांच्या महाविद्यालय / संस्थेतील काळात एकदाच भरावयाचे आहे.

**विशेष सूचना :**

(१) उपरोक्त शुल्काव्यतिरिक्त शेवटच्या सत्राच्या नोंदणीच्या वेळी एकत्रित श्रेणीपत्रक / गुणपत्रक शुल्क रु.१००/- विद्यापीठाकडे जमा करावे लागेल.

(२) महाराष्ट्र शासनाच्या सवलतीच्या नियमाप्रमाणे विद्यार्थीनी आणि राखीव प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मिळणा-या सवलती या राज्य शासनाच्या वेळोवेळी सुधारित नियमाप्रमाणे दिल्या जातील.

(३) गुणपत्रिका / परीक्षा शुल्क संबंधित विद्यापीठात जमा करावे.

(४) विद्यार्थ्यांस शिष्यवृत्ती मंजूर न झाल्यास विद्यार्थ्याने पूर्ण शुल्क भरणे बंधनकारक राहील.

## १७. प्रवेश कार्यक्रम

१७.१ प्रवेश प्रक्रियेचे सन २०२५-२६ साठीचे वेळापत्रक.

| अ. क्र. | कार्यक्रम | अंतिम दिनांक |
|---|---|---|
| १. | संकेतस्थळावर ऑनलाईन प्रवेश अर्जाची उपलब्धता व जागांच्या वाटपाची प्रसिध्दी. | ११-१२-२०२५ |
| २. | ऑनलाईन प्रवेश अर्ज व त्यासोबतची अनिवार्य / आवश्यक ती स्कॅन केलेली कागदपत्रे संकेतस्थळावर अपलोड करावयाचा अंतिम दिनांक | २४-१२-२०२५ |
| ३. | अंतरिम गुणवत्ता यादीची प्रसिध्दी दिनांक | २८-१२-२०२५ (सायं.५.३० नंतर) |
| ४. | ऑनलाईन पध्दतीने हरकत नोंदणीचा कालावधी | २९-१२-२०२५ ते ०१-०१-२०२६ |
| ५. | अंतिम गुणवत्ता यादीची प्रसिध्दी. | ०३-०१-२०२६ (सायं.५.३० नंतर) |
| ६. | (i) पहिल्या प्रवेश वाटप फेरीच्या यादीची प्रसिध्दी | ०६-०१-२०२६ (सायं.५.३० नंतर) |
| | (ii) रिपोर्टिंगचा कालावधी | ०७-०१-२०२६ ते ०९-०१-२०२६ |

| अ. क्र. | कार्यक्रम | अंतिम दिनांक |
|---|---|---|
| ७. | (i) दुसऱ्या प्रवेश वाटप फेरीच्या यादीची प्रसिध्दी. (रूपांतरासह) | १२-०१-२०२६ (सायं.५.३० नंतर) |
| | (ii) रिपोर्टिंगचा कालावधी | १३-०१-२०२६ ते १५-०१-२०२६ |
| ८. | विषयनिहाय व प्रवर्गनिहाय शेवटच्या प्रवेशित गुणांच्या तपशीलाची (last merit / cutt off) प्रसिध्दी | १७-०१-२०२६ |
| ९. | तिसरी प्रवेश वाटप फेरी (**परिशिष्ट 'जे'** येथील कार्यपध्दतीनुसार) | १९-०१-२०२६ व २०-०१-२०२६ |
| १०. | वर्ग सुरु होण्याचा दिनांक | १९-०१-२०२६ |

**टीप :**

(१) **<u>रविवारी तसेच शासकीय सुटीच्या दिवशी महाविद्यालय / संस्थास्तरावर प्रवेश प्रक्रियाविषयक कार्यवाही चालू राहील.</u>**

(२) दुस-या प्रवेश वाटप फेरीनंतर विविध कारणामुळे जागा रिक्त असल्यास त्या जागा तिसऱ्या प्रवेश वाटप फेरीतून संबंधित महाविद्यालय / संस्था यांच्यास्तरावर 'मे. ॲनालिटीका बिझीनेस सोल्युशन्स, पुणे' यांनी प्रसिध्द केलेल्या अंतिम गुणवत्ता यादीतून भरण्यात येतील.

(३) प्रवेश प्रक्रियेकरिता वेगळे मुलाखत पत्र देण्यात येणार नाही.

१७.२ या माहिती पुस्तिकेमध्ये विविध आचार्य पदवी प्रवेशाचे नियम तसेच शैक्षणिक नियमावलीच्या सर्व अभ्यासक्रमांची थोडक्यात माहिती देण्यात आली आहे. सविस्तर माहितीसाठी प्रवेशाचे नियम व विनियम तसेच शैक्षणिक नियमावली पहावी.

**१८.** 'मे. ॲनालिटीका बिझीनेस सोल्युशन्स, पुणे' **चे संकेतस्थळ https://phd.agrimcaer.in दि. ११ डिसेंबर,२०२५ पासून कार्यरत राहील.**

**वर्षा लड्डा-उंटवाल** (भाप्रसे)
**महासंचालक**
**महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,**
**पुणे-४११ ००७.**

## प्रवेशाकरिता तपासावयाच्या कागदपत्रांची सूची

| अ. क्र. | बाब | होय / नाही |
|---|---|---|
| (१) | **(अ) महाराष्ट्र राज्यातील सक्षम प्राधिका-याने दिलेले अधिवास प्रमाणपत्र किंवा जन्म ठिकाणाचा उल्लेख असलेले, महाविद्यालय / शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र किंवा सक्षम प्रधिका-याकडील जन्म दाखला.** | |
| | **(ब) बाहेरील राज्यातील उमेदवारांचे अधिवास प्रमाणपत्र / रहिवाशी दाखला / जात, मूळ रहिवास व जन्मदाखला / नेटिव्हीटी सर्टिफिकेट** | |
| (२) | पदव्युत्तर पदवी परीक्षेचे गुणपत्रक किंवा श्रेणीपत्रक. | |
| (३) | **महाराष्ट्र कृषी विद्यापीठे परीक्षा मंडळाकडील सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील सामायिक प्रवेश परीक्षेचे गुणपत्रक.** | |
| (४) | महाविद्यालय / संस्था सोडल्याचे / महाविद्यालय / संस्था बदलीचे प्रमाणपत्र (शेवटी शिकत असलेल्या) [सदर दाखला उपलब्ध नसल्यास कुलसचिव / सहयोगी अधिष्ठाता यांच्या स्वाक्षरीचे पदव्युत्तर पदवी पूर्ण केली असल्याचे प्रमाणपत्र] किंवा जेथे प्रवेश अगोदर मिळालेला आहे त्या महाविद्यालय / संस्थेचे बोनाफाईड प्रमाणपत्र. | |
| (५) | अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), इतर मागासवर्ग, विशेष मागासप्रवर्ग, सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्ग या उमेदवारांचे **जात प्रमाणपत्र.** | |
| (६) | अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), इतर मागासवर्ग, विशेष मागासप्रवर्ग, सामाजिक आणि शैक्षणिकदृष्टया मागासवर्ग या उमेदवारांचे **जात वैधता प्रमाणपत्र.**<br>(सामाजिक आणि शैक्षणिकदृष्टया मागासवर्ग / इतर मागासवर्ग (ओबीसी) हया प्रवर्गातील ज्या उमेदवारांनी जात पडताळणी समितीकडे जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे, परंतु अद्याप सदर प्रमाणपत्र प्राप्त झालेले नाही, अशा उमेदवारांनी जात वैधता प्रमाणपत्राच्या जागी तसा अर्ज केल्याबाबतची पावती अपलोड करावी.) | |
| (७) | विमुक्त जाती-अ, भटक्या जमाती-ब, क, ड, इतर मागासवर्गीय जाती, विशेष मागास मागासवर्ग, सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्गातील उमेदवारांसाठी दिनांक ३१ मार्च,२०२६ पर्यंत ग्राह्य असलेले सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र. | |
| (८) | खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांच्या पात्रतेसाठी महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. राआधो-४०१९/ प्र.क्र.३१ /१६-अ, **दि.३१/५/२०२१** अनुसार आर्थिकदृष्टया दुर्बल घटकाचे चालू शैक्षणिक वर्षासाठी ग्राह्य असलेले प्रमाणपत्र. | |
| (९) | (अ) मा.पंतप्रधान / मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांची स्वाक्षरी असलेले अर्जदाराच्या माता / पिता / आजी / आजोबा यांचे **'स्वातंत्र्य सैनिक असल्याबाबतचे प्रमाणपत्र'.** | |
| | (ब) '**उमेदवार** स्वातंत्र्य सैनिकाच्या मुलाचा/मुलीचा मुलगा/मुलगी आहे' **अशा आशयाचे स्वातंत्र्य सैनिकाचे आणि जर स्वातंत्र्य सैनिक हयात नसल्यास स्वातंत्र्य सैनिकाच्या पती / पत्नीचे** रु.१०/- चा कोर्ट फी स्टॅम्प चिकटवलेल्या साध्या कागदावर **प्रतिज्ञापत्र. (सदर प्रतिज्ञापत्र नोटरीकृत असावे.)** | |

| अ. क्र. | बाब | होय / नाही |
|---|---|---|
| (१०) | संरक्षण दलातील कर्मचारी असल्याबाबतचे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांचे प्रमाणपत्र किंवा रेजिमेंटच्या समादेशक अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र किंवा सक्षम प्राधिकाऱ्याचे 'सैनिक' असल्याबाबतचे प्रमाणपत्र. | |
| (११) | सक्षम वैद्यकीय प्राधिका-याचे शारीरिक दिव्यांगत्वाचे (अपंग) प्रमाणपत्र.<br>[विकलांगतेची टक्केवारी शारिरीकदृष्टया दिव्यांग (अपंग) प्रवर्गाकरिता आरक्षण मागणाऱ्या विद्यार्थ्याच्या बाबतीत, ४० टक्क्यांपेक्षा कमी असता कामा नये. तथापि, भारताचे राजपत्र दि.१४/०५/२०१९ मध्ये दिलेल्या नियमावलीतील विकलांगतेच्या कमाल टक्केवारीचे निकष लागू असतील.] | |
| (१२) | लाभार्थ्यांच्या नावे असणारी, विद्यार्थ्याच्या / विद्यार्थीनीच्या माता पित्याची अथवा आजोबा-आजीची जमीन कृषी विद्यापीठ / पाटबंधारे / वीज / संरक्षण प्रकल्प यासाठी शासनाने संपादित केली असल्याचे विहित नमुन्यातील महाराष्ट्र शासनाच्या जिल्हा पुनर्वसन अधिकाऱ्याने / किंवा शासनाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने (प्राधिकृत केले असल्यास प्राधिकृत करण्यात आले असल्याच्या सक्षम अधिकाऱ्याच्या पत्रासह) **'प्रकल्प विस्थापित व्यक्तीकरिता दिलेले प्रमाणपत्र (पीएपी.)'.** | |
| (१३) | उमेदवार किंवा त्याचे माता-पिता किंवा आजा-आजी (पित्याकडून) शेतजमिनीचे मालक किंवा कूळ म्हणून शेतजमीन धारक आहे / आहेत आणि त्यांचे उत्पन्नाचे मुख्य साधन जमिनीच्या वैयक्तिक मशागतीतून आहे हे दर्शविणारे तहसिलदार / नायब तहसिलदारापेक्षा कनिष्ठ दर्जा नसलेल्या अधिका-याचे विहित नमुन्यामध्ये / तहसीलदार किंवा नायब तहसीलदार यांनी दिलेले त्यांच्याकडील उपलब्ध असलेल्या विहित नमुन्यामध्ये सन २०२३-२४ किंवा २०२४-२५ किंवा चालू वर्षातील **'शेतकरी असल्याबाबतचे प्रमाणपत्र (एजी)'.** | |
| (१४) | फक्त 'नास' [NAAS , National Academy of Agricultural Sciences] च्या समायोजित यादीमधील गुणप्राप्त नियतकालिकामध्ये प्रकाशित झालेले संशोधनपर लेख. (नियतकालिकाचे मुखपृष्ठ, अनुक्रमणिका, संशोधन लेखाचे पहिले पृष्ठ) | |
| (१५) | सेवेत असलेले उमेदवार असल्यास संबंधित नियुक्ती अधिकाऱ्याचे **चालू शैक्षणिक वर्षासाठीचे 'ना हरकत प्रमाणपत्र'.** | |
| (१६) | संकेतस्थळावर अपलोड केलेल्या प्रतींच्या सत्यतेबाबत परिशिष्ट 'डी' मधील स्वयंघोषणा पत्र. | |
| (१७) | स्वच्छताविषयक सुविधांबाबत **परिशिष्ट** 'एफ' मधील हमीपत्र. | |
| (१८) | महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्र. अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२/का-०३, दि. २३/८/२०२१ अन्वये विभागीय उपायुक्त (महिला व बालविकास) यांच्या छापील लेटर हेडवरील विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास यांच्या स्वाक्षरीचे विहित नमुन्यातील (''अ'' / ''ब'' / ''क'' प्रवर्गातील) अनाथ प्रमाणपत्र. | |

## परिशिष्ट 'अे'

### आचार्य पदवी अभ्यासक्रमासंदर्भात भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांचेकडे नसलेले विषय / मानांकन नसलेल्या विषयांची यादी

| अ.क्र. | विभाग | भाकृअपकडे नसलेले / मानांकन नसलेले | कृषी विद्यापीठ |
|---|---|---|---|
| १. | **कृषी :** सिंचन जलव्यवस्थापन | विषय भाकृअपकडे नाही | महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी जि.अहिल्यानगर |
| २. | **कृषी :** पशुधन उत्पादन व व्यवस्थापन | विषयास भाकृअपचे मानांकन नाही | |
| ३. | **कृषी :** दुग्धशास्त्र | विषय भाकृअपकडे नाही | |
| ४. | **कृषी :** पशुधन उत्पादन व व्यवस्थापन | विषयास भाकृअपचे मानांकन नाही | डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला |
| ५. | **कृषी :** दुग्धशास्त्र | विषय भाकृअपकडे नाही | |
| ६. | **कृषी :** पशुधन उत्पादन व व्यवस्थापन | विषयास भाकृअपचे मानांकन नाही | वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी |
| ७. | **कृषी :** दुग्धशास्त्र | विषय भाकृअपकडे नाही | |
| ८. | **कृषी :** पशुधन उत्पादन व व्यवस्थापन | विषयास भाकृअपचे मानांकन नाही | डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी |
| ९. | **कृषी :** दुग्धशास्त्र | विषय भाकृअपकडे नाही | |
| १०. | **कृषी : उद्यानविद्या**-फळशास्त्र | विषयास भाकृअपचे मानांकन नाही | |
| ११. | **कृषी : उद्यानविद्या**-भाजीपाला शास्त्र | विषयास भाकृअपचे मानांकन नाही | |
| १२. | **कृषी : उद्यानविद्या**- फुलशेती व प्रांगण सुशोभिकरण आरेखन | विषयास भाकृअपचे मानांकन नाही | |
| १३. | **कृषी : उद्यानविद्या**- मसाले, औषधी आणि सुगंधी पिकांचे रोपण | विषयास भाकृअपचे मानांकन नाही | |
| १४. | **कृषी अभियांत्रिकी :** कृषी संरचना व पर्यावरण व्यवस्थापन | विषयास भाकृअपचे मानांकन नाही | |
| १५. | **वनशास्त्र :** वनीय कुरण व वनशेती | विषयास भाकृअपचे मानांकन नाही | |
| १६. | **वनशास्त्र :** नैसर्गिक साधन व्यवस्थापन | विषयास भाकृअपचे मानांकन नाही | |
| १७. | काढणी पश्चात व्यवस्थापन अंतर्गत सर्व विषय | विषय भाकृअपकडे नाहीत | |

# <u>परिशिष्ट- 'बी'</u>

## शेतकरी असल्याबाबतच्या प्रमाणपत्राचा नमुना

( हे प्रमाणपत्र नायब तहसिलदारापेक्षा कनिष्ठ अधिका-याच्या स्वाक्षरीचे नसावे)

प्रमाणित करण्यात येते की, श्री. /श्रीमती.................................................................. (जमीन धारकाचे नांव) राहणार................ तालुका................. जि. ....................... हे श्री./कु. .................... ...................................... (विद्यार्थ्याचे नाव) यांचे/हिचे वडील/ आई /आजोबा /आजी (वडिलांकडून) असून श्री/श्रीमती............................................... यांच्या नांवे ........... हे. ..........आर इतकी शेतजमीन आहे. ही जमीन ......................................... अधिनियम,* १९........... चे कलम ............ मधील तरतुदीनुसार कमाल धारणेपेक्षा अधिक नाही. असेही प्रमाणित करण्यात येते की, त्यांचे उत्पनांचे मुख्य साधन त्यांच्या नांवे असलेल्या शेतजमिनीतून आहे.

ठिकाण - स्वाक्षरी
दिनांक - नांव
कार्यालयीन मोहर पदनाम

..............................................................................................................................

**टीप** (१) * येथे संबंधित अधिनियमाचे पूर्ण नाव द्यावे.
(२) स्वाक्षरी व कार्यालयीन मोहर ही अधिकृत अधिका-याचीच असावी.
(३) 'शेतकरी' म्हणजे अशी व्यक्ती की, जिच्या नावे असलेली शेतजमीन संबंधित महसुली विभागाच्या जमीन अधिनियमानुसार कमाल धारणेपेक्षा अधिक नाही.
(४) विद्यार्थी स्वतः जमीन मालक असल्यास जमीनधारकाचे नांव त्याचेच राहील.

## <u>परिशिष्ट ‘सी’</u>

## महाराष्ट्र शासन

प्रमाणपत्र क्र.

फोटो

## वर्ष २०२५-२६ करिता ग्राह्य
## आर्थिकदृष्टया दुर्बल घटकाच्या पात्रतेसाठी प्रमाणपत्र

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६अ, दिनांक ३१/५/२०२१ अन्वये (आर्थिकदृष्टया दुर्बल घटकासाठी विहित केलेल्या १० टक्के आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी)

प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीमती/कुमारी ........................................................ श्री/श्रीमती ................................................... यांचा/यांची मुलगा/मुलगी गाव/शहर .............. तालुका .................... जिल्हा/विभाग ................................. महाराष्ट्र चे रहिवासी आहेत. तो/ती .................................... जातीचे असून जात/पोटजात/वर्ग चे असून सदर जात महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अनुसूचित जमाती, निरधीसूचित जमाती (वि.जा.), भटक्या जमाती (भ.ज.), विशेष मागास प्रवर्ग (वि.मा.प्र.) आणि इतर मागास वर्ग (इ.मा.व.) यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम,२००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८) यामध्ये नमूद केलेल्या प्रवर्गांतर्गत होत नाही.

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र. राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६ अ, दिनांक १२/०२/२०१९ अन्वये त्याच्या/तिच्या कुटुंबाचे सर्व स्त्रोतांचे वर्ष .................. मधील एकत्रित वार्षिक उत्पन्न रू. ......................./- असून, सदर उत्पन्न रू.८,००,०००/- पेक्षा कमी आहे. त्यामुळे असे प्रमाणित करण्यात येत आहे की, तो/ती यांचा आर्थिकदृष्टया दुर्बल घटकामध्ये समावेश होतो.

ठिकाण :

दिनांक :

स्वाक्षरी :

नाव :

पदनाम :

हे प्रमाणपत्र अर्जकर्त्याने सादर केलेल्या खालील कागदपत्र/पुरावे यांच्या आधारावर निर्गमित करण्यात येत आहे.

१ ..........................................................................................

२ ..........................................................................................

३ ..........................................................................................

## परिशिष्ट ‘डी’

## ‘मूळ प्रतींविषयी स्वयं घोषणापत्र’

| |
|---|
| अर्जदाराचा फोटो |

मी ....................................... श्री. ................................. यांचा मुलगा / मुलगी वय ............ वर्ष, आधार क्रमांक (असल्यास) .............. व्यवसाय ................ राहणार ................. याद्वारे घोषित करतो / करते की, मी संकेतस्थळावर अपलोड केलेल्या सर्व कागदपत्रांच्या प्रती मूळ प्रतीप्रमाणे खऱ्या आहेत. त्या खोटया असल्याचे आढळून आल्यास, भारतीय दंड संहिता आणि / किंवा संबंधित कायदयानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण :- ...............     अर्जदाराची सही ......................

दिनांक :- ...............     अर्जदाराचे नावः.......................

## परिशिष्ट 'ई'

## ' उमेदवारांसाठी महत्वाच्या सूचना'

(१) प्रवेश अर्ज भरण्यापूर्वी **https://phd.agrimcaer.in** या संकेतस्थळावर **'Application Flow Chart'** या शिर्षाद्वारे दर्शविण्यात आलेल्या प्रवेश पध्दतीच्या टप्प्यांचे अवलोकन करावे.

(२) प्रवेश माहिती पुस्तिकेमधील मुद्दा क्र. १७ येथे नमूद करण्यात आलेल्या वेळापत्रकाचे नीट आकलन करावे.

(३) प्रवेश प्रक्रिया संपूर्णतः ऑनलाईन असल्याने **www.mcaer.org** किंवा **https://phd.agrimcaer.in** या संकेतस्थळावर उमेदवाराने प्रवेश अर्जाद्वारे वैयक्तिक व शैक्षणिक माहिती भरावी.

(४) संकेतस्थळावर प्रवेश अर्ज भरल्यानंतर स्वाक्षरी आणि आवश्यक त्या सर्व कागदपत्रांच्या मूळप्रती स्कॅन करून संकेतस्थळावर अपलोड कराव्यात.

(५) स्कॅन करून अपलोड केलेली कागदपत्रे वाचनीय असावीत. याची खातरजमा करूनच कागदपत्रे अपलोड करावीत. अपलोड केलेली कागदपत्रे वाचनीय नसल्यास ते ग्राह्य धरण्यात येणार नाहीत व त्याची जबाबदारी पूर्णतः उमेदवाराची असेल.

(६) **खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी तसेच महाराष्ट्राबाहेरील सर्व उमेदवारांसाठी रु.२०००/- तर महाराष्ट्रातील सामाजिक आरक्षित प्रवर्ग, दिव्यांग व अनाथ प्रवर्गातील उमेदवारांसाठी रु.१०००/- प्रवेश अर्ज शुल्क आहे. सदरचे शुल्क नेट बँकींग, डेबिट कार्ड किंवा क्रेडीट कार्ड द्वारे भरावे. प्रवेश अर्ज भरल्यानंतर असे शुल्क भरण्याची व्यवस्था संकेतस्थळावर केलेली आहे. सदरचे शुल्क ना परतावा आहे.**

(७) उमेदवाराचे पासपोर्ट आकाराचे सध्याचे छायाचित्र स्कॅन करून संकेतस्थळावर अपलोड करावे.

(८) प्रवेश अर्जामधील माहिती योग्य असल्याची, त्याप्रमाणे कागदपत्रे अपलोड केल्याची व प्रवेश शुल्क भरल्याची खातरजमा झाल्यानंतरच प्रवेश अर्ज दाखल करण्याचे बटन दाबावे. एकवेळा दाखल झालेल्या प्रवेश अर्जामध्ये दुरस्त्या / सुधारणा करता येणार नाहीत. याची उमेदवाराने नोंद घ्यावी.

(९) (अ) अंतरिम गुणवत्ता यादी प्रसिध्द झाल्यानंतर आपले नाव, प्रवर्ग, गुण, अधिभार इत्यादी माहिती अचूक आहे, याची संकेतस्थळाद्वारे खातरजमा करावी.

(ब) माहितीमध्ये काही त्रुटी निदर्शनास आल्यास, पुराव्यादाखल कागदपत्राचे स्कॅन करून अशा स्कॅन कागदपत्रांसह वेळापत्रकात दिलेल्या मुदतीमध्ये उमेदवाराने

आपल्या ‘लॉग-इन आय्‌डी’ व ‘पासवर्ड’च्या आधारे त्रुटीची ऑन लाईन पूर्तता करावी.

(१०) (अ) वेळापत्रकात नमूद केलेल्या दिनांकास प्रसिध्द केलेल्या महाविद्यालयनिहाय 'प्रवेश यादी'चे अवलोकन करावे.

(ब) **‘वाटप यादी’मध्ये नाव असलेल्या उमेदवाराने आपल्या ‘लॉग-इन आयडी’द्वारे ‘तात्पुरते प्रवेश वाटपपत्र’ (Provisional Allotment Letter) प्राप्त करून घ्यावे.**

**(११)** (अ) ज्या उमेदवारास प्रवेशाचे वाटप झालेले आहे, अशा उमेदवारास प्रवेश घ्यावयाचा असल्यास त्याने संकेतस्थळावर अपलोड केलेल्या सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रती व आवश्यक त्या शुल्कासह संबंधित महाविद्यालयामध्ये, वाटपपत्रावर **(Provisional Allotment Letter)** नमूद केलेल्या **अंतिम दिनांकापर्यंत विहित वेळेत उपस्थित रहावे.**

(ब) अशा उमेदवाराकडील आवश्यक ती मूळ कागदपत्रे महाविद्यालयाकडून तपासण्यात येतील व योग्य असल्यास उमेदवाराचा प्रवेश निश्चित करतील.

**(१२)** (अ) प्रवेश घ्यावयाचा असल्यास उमेदवाराने नियमानुसार शुल्क व आवश्यक ती मूळ कागदपत्रे महाविद्यालयात जमा करावीत.

**(ब) ज्या उमेदवारांना शासनाकडून शुल्काची प्रतिपूर्ती होते, अशा उमेदवारांनी शुल्क भरु नये.**

(क) प्रवेश घ्यावयाचा नसल्यास, प्रवेश घ्यावयाचा नसल्यास, **संकेतस्थळावर उमेदवाराच्या लॉग-इनद्वारे डेबीट कार्ड / क्रेडीट कार्ड / नेट बँकींगद्वारे रू.२००/- ऑनलाईन अदा करून प्रवेश नाकारता येईल.**

**(१३)** (अ) प्रवेशाची नोंदणी केल्यानंतर प्रवेश रद्द करावयाचा असल्यास संबंधित **महाविद्यालयाच्या सहयोगी अधिष्ठाता / प्राचार्य यांच्यामध्ये प्रवेश रद्द करण्याबाबत विनंती अर्ज सादर करावा.**

(ब) अशाप्रकरणी **प्रवेश माहिती पुस्तिकेतील मुद्दा क्र. ४.१८ नुसार आवश्यक ते शुल्क व मूळ कागदपत्रे महाविद्यालयाकडून परत घ्यावीत.**

(१४) उमेदवार स्वतः उपचारार्थ रूग्णालयात दाखल असल्यास व त्यास विहित मुदतीत प्रवेशासाठी उपस्थित राहणे शक्य नसल्यास अशावेळी उमेदवाराच्या गैरहजेरीत त्यास प्रवेश मिळू शकतो. मात्र उमेदवाराने अशाप्रसंगी एखाद्या व्यक्तीस स्वतःच्या स्वाक्षरीने प्राधिकृत करणे आवश्यक आहे. प्राधिकृत केलेल्या व्यक्तीने प्राधिकार पत्रासोबत उमेदवाराचे तात्पुरते वाटपपत्र, उमेदवाराची सर्व मूळ कागदपत्रे, संबंधित रुग्णालयाचे प्रमाणपत्र आणि आवश्यक ते शुल्क सोबत आणावे. प्राधिकार पत्राचा विहित नमुना **परिशिष्ट ‘जी’** येथे देण्यात आला

आहे. ही बाब, तिसऱ्या प्रवेश वाटप फेरीच्या वेळी उमेदवार रूग्णालयात दाखल झालेला असल्यास त्यासाठीही लागू असेल.

**(१५)** ऑनलाईन प्रवेश अर्ज भरतांना मूळ कागदपत्रांच्या आधारे उमेदवारांने योग्य माहिती प्रवेश अर्जात द्यावी. चुकीची माहिती दिल्यास अशा चुकीच्या माहितीच्या आधारे झालेला प्रवेश रद्द करण्यात येईल.

**(१६)** ज्या विद्यार्थ्यांना स्वेच्छेने मरणोत्तर अवयव दान करावयाचे आहेत. त्यांनी परिशिष्ट **'के'** येथील 'मरणोत्तर अवयवदान संमती अर्ज' भरून महाविद्यालयाकडे द्यावा.

(१७) अपलोड केलेल्या मूळ प्रतींच्या सत्यतेबाबत परिशिष्ट 'डी' येथील नमुन्यात स्वघोषणापत्र संकेतस्थळावर अपलोड करणे अनिवार्य आहे.

(१८) शासन परिपत्रक, कृषी व पदुम विभाग, क्र. संकीर्ण - १५१७ / प्र.क्र.१८५ / ६-अे, दि.५/६/२०१७ अनुसार ज्या उमेदवारांचे मतदार यादीमध्ये नाव नोंदविलेले नाही, अशा उमेदवारांनी मतदार यादीमध्ये नाव नोंदविण्याविषयी हमी पत्र व नमुना ६, ७, ८ व ८-अ व्यवस्थित भरून प्रवेश घेतेवेळी संबंधित महाविद्यालयाकडे जमा करावे.

(१९) नैसर्गिक आपत्ती किंवा तांत्रिक अडचणींमुळे प्रवेश प्रक्रियेच्या नियोजित वेळापत्रकामध्ये किंवा इतर बाबींमध्ये बदल करावे लागतात. असे बदल किंवा सुधारणांबाबतच्या सूचना वेळोवेळी संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येतात. याकरिता उमेदवारांनी प्रवेश प्रक्रियेच्या कालावधीमध्ये संकेतस्थळावरील अद्ययावत सूचनांची माहिती घेत रहावी.

(२०) आचार्य पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेशी संबंधित संपर्क अधिका-यांची नावे व त्यांचे दूरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक परिशिष्ट 'एल' येथे देण्यात आलेले आहेत.

---

## परिशिष्ट 'एफ'

**प्रवेश घेताना महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी त्यांना असणा-या स्वच्छताविषयक सवयी तसेच त्यांच्या घरी असणा-या स्वच्छता विषयक सुविधांची माहिती भरण्याचा नमुना**

| | | |
|---|---|---|
| १ | नाव | ................................................................................ |
| २ | कायम रहिवासाचा पत्ता | ................................................................................<br>................................................................................ |
| ३ | कुटुंबाची माहिती | कुटुंबातील सदस्यांची संख्या-<br>शौचालय वापर करणा-यांची संख्या- |
| ४ | शौचालयाची उपलब्धता | आहे ☐ नाही ☐<br>शौचालयाची उपलब्धता नसल्यास कारण-<br>................................................................................ |
| ५ | हात धुण्याची सवय | जेवणापूर्वी- आहे ☐ नाही ☐<br>असल्यास- साबणाने ☐ पाण्याने ☐ इतर ☐<br>शौचानंतर- आहे ☐ नाही ☐<br>असल्यास- साबणाने ☐ पाण्याने ☐ इतर ☐ |
| ६ | वचननामा | शौचालयाची आवश्यकता व त्याचा सातत्याने वापर करण्याबाबतचे संस्थेने केलेले आवाहन मी वाचले व त्याबाबतचे महत्व मला मनापासून पटले आहे. मी याचे महत्व माझ्या घरातील सर्वांना समजावून सांगून **येत्या तीन महिन्यात** माझ्या घरी शौचालय बांधेन व सर्व जण त्याचा नियमित वापर करण्याचे वचन मी संस्थेस देत आहे. |

दिनांक :-

स्वाक्षरी-

## परिशिष्ट 'जी'

## प्राधिकार पत्र

मी खाली सही करणार श्री./श्रीमती. ................................ .......................... ......... ....... प्रवेश अर्ज क्र........................, आचार्य पदवी प्रवेश प्रक्रिया २०२५-२६ अंतर्गत दि..................... ते दि. ................... या कालावधीतील ................ प्रवेश वाटप फेरीद्वारे मला तात्पुरते वाटप पत्र प्राप्त झाले आहे.

मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, मला दि. ..................... पासून ........................................................................................ (रूग्णालयाचे नाव व पत्ता) या रूग्णालयामध्ये उपचारार्थ दाखल करण्यात आले आहे आणि .............................. ........................................................ (महाविद्यालयाचे नाव व पत्ता) महाविद्यालयामध्ये सदर वाटप फेरीस उपस्थित राहण्यास मी शारीरिकदृष्टया सक्षम नाही.

यास्तव माझा / माझी ........................ (नाते) श्री. / श्रीमती ................. .................. .................. यांना वरील वाटप फेरीस उपस्थित राहण्याकरिता मी प्राधिकृत करीत आहे. त्यांनी माझ्या समक्ष खाली स्वाक्षरी केली आहे आणि त्यांच्याकडे त्यांचे छायाचित्र असलेले ओळखपत्रसुध्दा (photo identity) आहे.

आवश्यक वैद्यकीय प्रमाणपत्र, इतर कागदपत्रे व शुल्क मी त्यांच्याकडे सुपूर्द केलेले आहे.

परवानगी आणि विचार होण्यासाठी विनंती आहे.

**आपला,**

**नामनिर्देशित केलेल्या व्यक्तीची स्वाक्षरी व नाव**

**उमेदवाराची स्वाक्षरी व नाव**

प्रति,

सहयोगी अधिष्ठाता / प्राचार्य,

.....................................................

.....................................................

.....................................................

## <u>परिशिष्ट</u> 'एच'

## 'प्रवेश प्रक्रियेसंदर्भात महाविद्यालयांच्या अधिष्ठाता / सहयोगी अधिष्ठाता यांच्यासाठी महत्वाच्या सूचना'

(१) वाटपपत्रावर नमूद केलेल्या अंतिम दिनांकापर्यंत उमेदवार वाटप पत्र घेऊन आल्यानंतर, वाटप पत्रामध्ये नमूद केलेला उमेदवाराचा प्रवर्ग, गुण, महाविद्यालय सोडल्याचा दाखला / स्थलांतराचा दाखला इत्यादीविषयक सर्व मूळ कागदपत्रे तपासावीत.

(२) (अ) आवश्यक ती सर्व कागदपत्रे उपलब्ध असल्यास उमेदवाराकडून नियमानुसार शुल्क भरुन प्रवेशाची नोंदणी करावी.

(ब) महाविद्यालयाच्या 'लॉग इन'द्वारे संकेतस्थळावर प्रवेश दिल्याची नोंद करून 'मे. ॲनालिटीका बिझीनेस सोल्युशन्स, पुणे'कडे कळवावी.

(क) **ज्या उमेदवारांसंदर्भात शासनाकडून शुल्काची प्रतिपूर्ती होते, अशा उमेदवारांकडून शुल्क वसूल करू नये.**

(३) प्रवेशाची नोंदणी झाल्यानंतर विद्यार्थ्यास प्रवेश रद्द करावयाचा असल्यास प्रवेश माहिति पुस्तिकेतील मुद्दा क्र. ४.१८ येथे नमूद केलेल्या पध्दतीने कार्यपध्दती अवलंबावी आणि महाविद्यालयाच्या 'लॉग इन'द्वारे नोंद करून 'मे. ॲनालिटीका बिझीनेस सोल्युशन्स, पुणे'ला आणि संचालक (शिक्षण), कृषी परिषद यांना कळवावे.

(४) प्रवेश देतेवेळी उमेदवार आवश्यक कागदपत्रे सादर करू न शकल्यास अशा उमेदवाराचा प्रवेश फेटाळण्यात (Reject) यावा आणि लॉग इन आयडी व पासवर्डचा वापर करून प्रवेश फेटाळण्याचे कारण संकेतस्थळावर नमूद करण्यात यावे.

(५) प्रवेश फे-या सुरु झाल्यानंतर किमान पाच महिन्यांपर्यंत सर्व महाविद्यालयांनी लॉग इन आयडी व पासवर्डचा वापर करून संकेतस्थळावर माहिती अद्ययावत करत रहावी.

(६) उमेदवार स्वतः उपचारार्थ रूग्णालयात दाखल असल्यास व त्यास विहित मुदतीत प्रवेशासाठी / प्रवेश नाकारण्यासाठी उपस्थित राहणे शक्य नसल्यास अशावेळी उमेदवाराच्या गैरहजेरीत प्राधिकृत केलेल्या व्यक्तीने प्राधिकृत पत्रासोबत संबंधित रुग्णालयाचे प्रमाणपत्र, तात्पुरते वाटपपत्र, आवश्यक ती मूळ कागदपत्रे व योग्य ते शुल्क सादर केल्यास उमेदवारास त्याच्या गैरहजेरीत प्रवेश देण्यात यावा / प्रवेश नाकारण्यात यावा. ही बाब, तिसऱ्या प्रवेश वाटप फेरीच्या वेळी उमेदवार रूग्णालयात दाखल झालेला असल्यास त्यासाठीही लागू असेल.

(७) मरणोत्तर अवयवदान करण्याविषयी विद्यार्थ्याची संमती असल्यास महाविद्यालयात प्रवेश घेतेवेळी अशा विद्यार्थ्यांकडून परिशिष्ट **'के'** येथील 'मरणोत्तर अवयवदान संमती अर्ज' भरून घ्यावा व महाविद्यालय ओळखपत्रावर 'अवयवदाता' अशी नोंद करावी.

(८) ज्या उमेदवारांचे मतदार यादीमध्ये नाव नोंदविलेले नाही, अशा उमेदवारांचे मतदार यादीमध्ये नाव नोंदविण्याविषयी उमेदवाराकडून हमी पत्र व नमुना ६, ७, ८ व ८-अ व्यवस्थित भरून घेऊन शासन परिपत्रक, कृषी व पदुम विभाग, क्र. संकीर्ण-१५१७/प्र.क्र.१८५/६-अे, दि.५/६/२०१७ अनुसार कार्यवाही करावी.

---

# परिशिष्ट 'आय'

## AFFIDAVIT BY THE STUDENT

I, *(full name of student with admission / registration / enrolment number)* s/o d/o Mr./Mrs./Ms. ______________________________________, having been admitted to ______________*(name of the institution)* ___________, have received a copy of the UGC Regulations on Curbing the Menace of Ragging in Higher Educational Institutions, 2009, (hereinafter called the ''Regulations'') carefully read and fully understood the provisions contained in the said Regulations.

2) I have, in particular, perused clause 3 of the Regulations and am aware as to what constitutes ragging.

3) I have also, in particular, perused clause 7 and clause 9.1 of the Regulations and am fully aware of the penal and administrative action that is liable to be taken against me in case I am found guilty of or abetting ragging, actively or passively, or being part of a conspiracy to promote ragging.

4) I hereby solemnly aver and undertake that

a) I will not indulge in any behaviour or act that may be constituted as ragging under clause 3 of the Regulations.
b) I will not participate in or abet or propagate through any act of commission of omission that may be constituted as ragging under clause 3 of the Regulations.

5) I hereby affirm that, if found guilty of ragging, I am liable for punishment according to clause 9.1 of the Regulations, without prejudice to any other criminal action that may be taken against me under any penal law or any law for the time being in force.

6) I hereby declare that I have not been expelled or debarred from admission in any institution in the country on account of being found guilty of abetting or being part of a conspiracy to promote, ragging; and further affirm that, in case the declaration is found to be untrue, I am aware that my admission is liable to be cancelled.

Declared this ______ day of _____________ month of ___________ year.

___________________________
Signature of deponent
Name :

VERIFICATION

Verified that the contents of this affidavit are true to the best of my knowledge and no part of the affidavit is false and nothing has been concealed or misstated therein.

Verified at *(place)* on this the *(day)* of *(month), (year)*.

Signature of deponent

Solemnly affirmed and signed in my presence on this the *(day)* of *(month)*, *(year)* . after reading the contents of this affidavit.

OATH COMMISSIONER

## परिशिष्ट ‘जे’

## तिसऱ्या प्रवेश वाटप फेरीची कार्यपध्दती

तिसऱ्या प्रवेश वाटप फेरीपूर्वी राबविण्यात आलेल्या प्रवेश फे-यांद्वारे प्रवेश मिळालेल्या उमेदवारांनी नोंदणी न केल्याने अथवा इतर कारणाने जागा रिक्त असल्यास अशा रिक्त जागांसाठी दि.१९/०१/२०२६ व दि.२०/०१/२०२६ या कालावधीत संबंधित महाविद्यालयस्तरावर खालील कार्यपध्दतीने ऑनलाईन महाविद्यालयनिहाय प्रवेश वाटप फेरी राबविण्यात येईल.

यापूर्वी राबविण्यात आलेल्या प्रत्येक प्रवेश वाटप फेरीतील अंतिम गुणवत्ताविषयक प्रवर्गनिहाय (Categorywise Last Merit) तपशील व अद्ययावत रिक्त जागांचा प्रवर्गनिहाय तपशील मे. ॲनालिटीका बिझीनेस सोल्युशन्स, पुणे यांच्याकडून **www.mcaer.org** व **https://phd.agrimcaer.in** या संकेतस्थळावर दि. १७ जानेवारी,२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात येईल.

**राज्यस्तरीय / विद्यापीठस्तरीय गुणवत्ता यादीत समाविष्ट असलेले आणि चालू शैक्षणिक वर्षाच्या आचार्य पदवी प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेशित नसलेले (not admitted) उमेदवार ऑनलाईन महाविद्यालयनिहाय प्रवेश वाटप फेरीकरिता पात्र असतील.** अशा पात्र उमेदवारांनी तसेच संबंधित महाविद्यालयांनी खालील बाबी विचारात घ्याव्यात.

(१) संकेतस्थळावरील रिक्त जागांचा तपशील विचारात घेऊन उमेदवारांना ज्या महाविद्यालयात प्रवेश घ्यावयाचा आहे, त्या महाविद्यालयात दि.१९/०१/२०२६ व दि.२०/०१/२०२६ **या कालावधीत सकाळी १०.०० ते दुपारी १३.०० या कालावधीत** आवश्यक ती सर्व मूळ कागदपत्रे व शुल्कासह उमेदवारांनी उपस्थित राहावे.

(२) संबंधित संस्था / महाविद्यालयाचे अधिष्ठाता / सहयोगी अधिष्ठाता यांनी स्वतः **सकाळी १०.०० ते १३.०० या वेळेत उपस्थित असलेल्या उमेदवारांची प्रवर्गनिहाय गुणवत्ता यादी तयार करून ती नोटीस बोर्डवर प्रसिध्द करावी.**

(३) वरीलप्रमाणे पात्र उमेदवारांचा गुणानुक्रमे विचार करून रिक्त जागांसाठी प्रवेश देण्यात यावेत. **आरक्षित प्रवर्गातील रिक्त जागांसाठी संबंधित प्रवर्गाच्या उमेदवारांनाच प्राधान्यक्रमाने प्रवेश देण्यात यावेत.** संबंधित आरक्षित प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध नसल्यास, शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग, क्र.मकृवि-२०१०/प्र.क्र.१५५/७अे, दि.२०/१०/२०११ मधील परिशिष्ट २ येथील कार्यपध्दतीनुसार अशा रिक्त जागांवर तिसऱ्या प्रवेश वाटप फेरीच्या शेवटच्या दिवशी म्हणजेच **दि. २० जानेवारी,२०२६ रोजी** उपस्थित असलेल्या इतर उमेदवारांना गुणानुक्रमाने प्रवेश देण्यात यावेत. सदर शासन निर्णय कृषी परिषद व मे. ॲनालिटीका बिझीनेस सोल्युशन्स, पुणे यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. **मात्र कोणत्याही परिस्थितीत आरक्षित जागांवर प्रवेश मिळाला नाही, अशी तक्रार आरक्षित प्रवर्गाच्या उमेदवारांकडून कोणत्याही परिस्थितीत येणार नाही, याची दक्षता संबंधित अधिष्ठाता / सहयोगी अधिष्ठाता यांनी घ्यावी.**

(४) उच्च गुणवत्ताधारक उमेदवार उशिरा हजर झाल्यास आणि त्यावेळी जागा रिक्त असल्यास, अशा **उच्च गुणवत्ताधारक उमेदवारास प्रथम प्राधान्याने प्रवेश देण्यात यावा.**

(५) योग्य त्या उमेदवाराची प्रवेशासाठी निवड निश्चित झाल्यास त्याप्रमाणे मे. ॲनालिटीका बिझीनेस सोल्युशन्स, पुणे **यांच्या संकेतस्थळावर नोंदणी करून 'लॉग इन'द्वारे महाविद्यालयांनी संबंधित उमेदवारास प्रवेश द्यावा.** यासाठी संकेतस्थळावरील महाविद्यालयांच्या 'लॉग इन'मध्ये योग्य ती सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी 'मे. ॲनालिटीका बिझीनेस सोल्युशन्स, पुणे' यांची असेल.

(६) दि.१९/०१/२०२६ व दि.२०/०१/२०२६ या कालावधीत दररोज सायंकाळी ४.३० पर्यंत वरील प्रवेश प्रक्रिया संबंधित महाविद्यालयस्तरावर करण्यात यावी.

**(७)** महाविद्यालयांनी दरदिवशी प्रवेश देण्यात आलेल्या प्रवेशांबाबतचा तपशील **संचालक (शिक्षण) व 'मे. ॲनालिटीका बिझीनेस सोल्युशन्स, पुणे' यांच्याकडे सायंकाळी ५.०० वाजेपूर्वी ई-मेलद्वारे कळवावा.**

(८) तिसऱ्या प्रवेश वाटप फेरीद्वारे प्रवेश मिळालेल्या उमेदवारास त्याच्या 'लॉग इन'मध्ये प्रशासकीय कारणास्तव 'मे. ॲनालिटीका बिझीनेस सोल्युशन्स, पुणे'ने तात्पुरते 'प्रवेश वाटप पत्र' उपलब्ध करून द्यावे.

(९) तिसऱ्या प्रवेश वाटप फेरीच्या कालावधीमध्ये उमेदवाराने प्रवेश रद्द केला असल्यास किंवा इतर कारणामुळे प्रवेश रद्द केल्यास, यामुळे रिक्त झालेली जागा त्याच दिवशी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी, मात्र त्याच दिवशी भरण्यात येऊ नये. अशी रिक्त जागा दुस-या दिवसापासून प्रवेशाकरिता उपलब्ध करून देण्यात यावी. (तिसऱ्या प्रवेश वाटप फेरीच्या शेवटच्या दिवशी रिक्त होणा-या जागांसंदर्भात ही बाब लागू नसेल.)

-----------------------------

## परिशिष्ट ‘के’

## **‘ मरणोत्तर अवयवदान संमती अर्ज ’ (ऐच्छिक)**

मी नाव श्री./श्रीमती. .................................. ........... ............ ... ................ प्रवेश अर्ज क्र......................... स्वेच्छेने लिहून देतो की, माझ्या मरणोत्तर माझे अवयव दान करण्यासंबंधी मी संमती देत आहे.

ठिकाणः स्वाक्षरी ...................................

दिनांकः नाव- ....................................

अर्ज क्रमांक .....................................

## परिशिष्ट- 'एल'

## आचार्य पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेशी संबंधित संपर्क अधिकारी

| अ.क्र. | अभ्यासक्रम/ महाविद्यालये | संपर्क अधिकाऱ्याचे नाव | संपर्क अधिकाऱ्याचा दूरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक | ई-मेल पत्ता |
|---|---|---|---|---|
| १. | कृषी, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी | डॉ. सी. बी. वायळ | ०२४२६-२४३२०७/ ९४०५१८६३६६ | cbwayal@gmail.com |
| २. | हवामानशास्त्र, कृषी महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे | डॉ. आर. एच. शिंदे | ८२७५४७३१९८/ ०२०२५५३७०३३ | rhshinde20@gmail.com<br>adacpune@gmail.com<br>amfupune@gmail.com |
| ३. | कृषी अभियांत्रिकी, डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषी अभियांत्रिकी महाविद्यालय, राहुरी | डॉ. एस.बी. गाडगे | ०२४२६-२४३२०७/ ९८९०७६९४५३ | gadge_shailendra@yahoo.com |
| ४. | कृषी, पदव्युत्तर संस्था, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला | श्री. जे. आर. गावंडे | ९४२२४२३२८९ | adpgi@pdkv.ac.in |
| ५. | आण्विक जीवशास्त्र व जैवतंत्रज्ञान, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला | श्री. जे. आर. गावंडे | ९४२२४२३२८९ | adpgi@pdkv.ac.in |
| ६. | कृषी अभियांत्रिकी, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला | श्री. जे. आर. गावंडे | ९४२२४२३२८९ | adpgi@pdkv.ac.in |
| ७. | कृषी, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी | श्री. एम. एम. भोगांवकर | ९४२०९७८५९८ | adpgpbn@gmail.com |
| ८. | अन्नतंत्रज्ञान, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी | डॉ. के. एस. गाढे | ९४२१४५९४६१ | kailasgadhe69@gmail.com |

| अ.क्र. | अभ्यासक्रम/ महाविद्यालये | संपर्क अधिकाऱ्याचे नाव | संपर्क अधिकाऱ्याचा दूरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक | ई-मेल पत्ता |
|---|---|---|---|---|
| ९. | कृषी अभियांत्रिकी, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी | डॉ. व्ही. के. इंगळे | ९९००९३१२१४ | vkingle@vnmkv.ac.in |
| १०. | कृषी, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी | श्री. एस. एन. जाधव | ९९२१८७७५९६ | adacddapoli@rediffmail.com |
| ११. | मत्स्यविज्ञान, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी | डॉ. डी. आय. पठाण | ९४२२४४१३२२ | dabirpathan@gmail.com<br>dipathan@dbskkv.ac.in |
| १२. | कृषी अभियांत्रिकी, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी | श्री. ए. आर. मरकड | ९४२०७५२३९० | armarkad@dbskkv.ac.in |
| १३. | उद्यानविद्या, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी | डॉ. एन. व्ही. दळवी | ९१५८१४६५१२ | adcohd@rediffmail.com<br>adcohdapoli@dbskkv.ac.in |
| १४. | वनशास्त्र, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी | डॉ. व्ही. एम. म्हैस्के | ९३२५२९८८६२ | vinod.mhaiske@gmail.com<br>educofdap@gma |
| १५. | काढणी पश्चात तंत्रज्ञान, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी | डॉ. एस. बी. स्वामी | ९४२१६१००८२<br>९५४५४४१९७९ | sbswami@dbskkv.ac.in |